**महाराष्ट्र** गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनतर्फे विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज राज्यभरात दोन तासांचे 'काम बंद' आंदोलन करण्यात आले. सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत परिचारिकांनी सेवा थांबवून घोषणाबाजी आणि निदर्शने केली.

राज्यातील परिचारिकांच्या हजारो रिक्त पदांची भरती करावी, ही मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. मात्र, याबाबत शासनाकडून कोणताही ठोस निर्णय न झाल्याने परिचारिकांमध्ये नाराजी आहे. वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर रिक्त पदे भरणे अत्यावश्यक असतानाही शासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनने केला आहे. फेडरेशनच्या राज्य अध्यक्ष इंदुमती थोरात यांनी सरकारला इशारा देताना म्हटले की, शासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर राज्यभरात बेमुदत संप पुकारण्यात येईल. आमच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत आहे. हे आंदोलन आमच्यावर लादले गेले आहे.

## शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ हरपला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

■ कोल्हापूर

**शिक्षण,** आरोग्य आणि समाजसेवेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणारे पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंत पाटील अर्थात डी. वाय. पाटील (९१) यांचे



आज निधन झाले. कोल्हापुरातील कसबा बावडा येथील निवासस्थानी त्यांनी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उद्या सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत डॉ. पाटील यांचे पार्थिव 'यशवंत निवास' येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता अंत्ययात्रा निघून ५ वाजता डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात ९ मुलांसह मोठा आप्तपरिवार आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांचा जन्म पान ५ वर

## पीओपीच्या मूर्तींवर बंदी घालण्यास तीन वर्षे द्या! सरकारची कोर्टात भूमिका

■ मुंबई

**पंतप्रधान** मोदी यांच्या पर्यावरणस्नेही सण साजरे करण्याचे आवाहन करूनही राज्य सरकार त्याबाबत गंभीर नसल्याने उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने तुमची ही भूमिका पंतप्रधानांना कळविली आहे का? असा सवालही उपस्थित केला. राज्य सरकारने तूर्तास सण उत्सवातील पीओपी मूर्तींच्या वापरावर पूर्णपणे बंदी शक्य नाही. त्यासाठी व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. त्यामुळे पुढील तीन



वर्षांत ही बंदी टप्प्याटप्प्याने अंमलात आणली जाईल, अशी भूमिका घेत यंदाच्या वर्षी गेल्यावर्षीचे आदेश कायम ठेवण्याची विनंती राज्य सरकारने केल्याने खंडपीठाने हा सवाल उपस्थित केला.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पीओपी मूर्ती बाबत बदललेल्या भूमिकेला आव्हान देणारी याचिका ठाण्यातील पर्यावरणवादी कार्यकर्ते रोहित जोशी यांनी अॅड. सुनिता भट्टाचार्य यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल केली आहे. तर दुसरीकडे मूर्तिकार संघटनाने या याचिकेला ज्येष्ठ वकील अॅड. उदय वारंजीकर आणि अॅड. संजीव गोरवाडकर पान ७ वर

## होमिओपॅथी डॉक्टरांना अॅलोपॅथीची परवानगी नको! डॉक्टरांचा संप

■ मुंबई

**होमिओपॅथी** डॉक्टरांना सीसीएमपी (सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी)अभ्यासक्रमानंतर अॅलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यासाठी नोंदणी देण्याच्या निर्णयाला विरोध करत राज्यभरातील डॉक्टरांनी २४ तासांचा वैद्यकीय सेवा बंद पुकारला आहे. आयएमए, मार्डसह विविध वैद्यकीय संघटनांनी या निर्णयामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेवर परिणाम होऊ शकतो, असा दावा केला. आज सकाळी ६ वाजता सुरू झालेला हा संप बुधवारी सकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. सरकारने निर्णय मागे न घेतल्यास अत्यावश्यक सेवाही बंद करण्याचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे.

या बंददरम्यान सुरुवातीच्या टप्प्यात बाह्यरुग्ण विभाग म्हणजेच ओपीडी सेवा बंद ठेवण्यात आली होती. मात्र, आपत्कालीन आणि अत्यावश्यक सेवा सुरुवातीला सुरू ठेवण्यात आल्याचे डॉक्टर संघटनांनी स्पष्ट केले. सरकारने निर्णय न घेतल्यास पान ७ वर

## डाबरच्या '१०० टक्के' दाव्यांवर आक्षेप घेत मध, तूप विक्री बंद!

■ नवी दिल्ली

**भारतीय** अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) डाबर इंडिया कंपनीला १०० टक्के असा दावा करणारी अनेक खाद्य उत्पादने विक्रीतून तातडीने मागे घेण्याचे आदेश दिले आहेत. १०० टक्के हा दावा संदिग्ध, पडताळणी करता न येणारा आणि ग्राहकांची दिशाभूल करणारा असल्याचे एफएसएसएआयने स्पष्ट केले आहे.

एफएसएसएआयने जारी केलेल्या आदेशानुसार मध, पल सायडर व्हिनेगर, व्हर्जिन नारळ तेल, तीळ तेल, गायीचे तूप, नारळ पाणी आणि नारळाचे दूध यांसारख्या उत्पादनांवर १०० टक्के नैसर्गिक, १०० टक्के शुद्ध, १०० टक्के शुद्धतेची हमी, १०० टक्के सेंद्रिय आणि १०० टक्के टेंडर कोकोनट वॉटर असे दावे केले




आहेत. हे दावे अन्न सुरक्षा व मानके जाहिरात व दावे नियम, २०१८ चे उल्लंघन असल्याचे प्राधिकरणाने म्हटले आहे. मात्र, या कारवाईचा अर्थ संबंधित पान ७ वर

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

पेशंटकेअर साठी आया-मौशी, पुरुष, नर्स, ब्रदर पाहिजेत. पगार- २४०००/-- ९०,०००/- **9321205984** {NC261370}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार (30,000- 90,000) **9820628009** {NC261362}

१ ते २४ तास घरकाम करण्यासाठी मुली व बायका पाहिजेत. **8369637847 / 8291432127** {NC261417}

हॉटेलसाठी उत्कृष्ट नाश्ता वाला पाहिजे. महाराष्ट्रीय आणि साऊथ इंडियन नाश्ता बनवता आला पाहिजे 25 ते 30 हजार पर्यंत वेतन मिळेल. संपर्क रत्नागिरी- **8805520300** {NC261411}

फायनान्शियल सल्लागार- निवृत्त, व्यावसायिक, गृहिणींसाठी दीर्घकालीन करिअर संधी:- **9320132162/ 9920062154** {NC261319}

इमीटेशन कामासाठी मुले / मुली पाहिजेत कल्प ज्वेलर्स, युनिट 102, ऑम शिवम सोसायटी, भरुचा रोड, सिलेक्शन बुक सेन्टरवर, दहिसर (ईस्ट) **9870041713** {NC261410}

वॉलपेपर्सच्या शोरूमसाठी प्युन पाहिजेत. अरीहंत, शॉप-११, शिवगंगा अपार्टमेंट, झवेर रोड, मुलुंड (वेस्ट), **9322246349.** {NC261440}

ब्युरोमध्ये वेस्टर्न लाईनकरीता अनुभवी आया, पेशंटकेअर दिवस पाळीकरीता पाहिजेत. 21,000/- **9920463209** {NC261361}

पाहिजे कॉम्प्युटर/ ऑफीस स्टाफ, DTP, डिजिटल मार्केटिंग, हेल्पर, हाऊसकिपींग, **9699924546** {NC261385}

## पाहिजेत

ॲडव्हेण्ट पेस्टकंट्रोलला फवारणीसाठी पुरुष किंवा महिला कामगार पाहिजेत. पगार+ ओव्हरटाइम साधारण Rs.18,000/-. वयोगट १८-३५ पर्यंतच उमेदवारांनी अर्ज करावेत, अेपोईण्टमेण्टसाठी संपर्क करा. **9322641813, 9819455093** ऑफीस पत्ताः- ॲडव्हेण्ट पेस्टकंट्रोल, ऑफिस क्र.-४, बिल्डिंग क्र.९, आसीसीनगर, पीएल लोखंडे मार्ग, चेंबूर (वेस्ट) - ४०००४३ {NC261380}

विरार (वेस्ट) प्रॉपर्टी कन्सल्टन्टच्या ऑफीसमध्ये अनुभवी टॅलीकॉलर पाहिजेत. **7700918713.** {NC261396}

टेलिफोन सिस्टिम मेंटेनन्स आणि रिपेअर साठी टेक्निशियन पाहिजेत. **9833224522** {NC26136}

त्वरा करा!!!! पार्ट/ फुलटाईम सर्व्हे फिल्डजॉब. किमान शिक्षण SSC, वयाची अट नाही, ॲन्ड्रॉइड मोबाईल आवश्यक, ऑनलाईन ॲप्लिकेशनवर काम, एरीया 2-3 किमी, दररोज 1000 /- पेक्षा जास्त कमवा. पॅमॅक फिनसर्व्ह प्रा. लि., बी-9, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट, डॉ. जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा (पश्चिम), मुंबई, संपर्कः सचिन दळवी : **9819078757**/ विनोद धामनकः **9967955502.** {NC261398}

कांदिवली चारकोप स्थित ऑफिस मध्ये हेल्पर मुले / पाहिजेत. **9821098330** {NC261427}

सेल्समन, सेल्सगर्ल पाहिजेत. वेगवेगळ्या ठिकाणी शोरूम एक्झिबीशन काऊंटरवर काम करण्याचा अनुभव आवश्यक उत्तम वेतन. मोबाईल **8655488008** {NC261400}

## पाहिजेत

इलेक्ट्रिकल कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार- 15,000/- ते 22,000/- गाडीभाडे मिळेल. **9820432870 / 9819017461** {NC261418}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला-सेल्स मॅनेजर, ॲडमिन अकाऊंटंट, ऑफिसबॉय, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, बाऊंसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायझर हाऊसकिपिंग मुले/मुली पाहिजेत- **9223380568/ 69** {NC261403}

हेडलबर्ग सिंगल कलर प्रिंटर, पंचिंग ऑपरेटर लॅमिनेशन ऑपरेटर, अकाऊंट साठी मुलगा पाहिजेत डोंबिवली स्टेशनपासून पिकप ड्रॉपची सुविधा श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो.नं. **9167736969** {NC261437}

DTP डिझायनर, कोऑर्डिनेटर, हेल्पर पाहिजेत. भांडुप येथे ऑफसेट डिजिटल प्रिंटिंग पॅकेजिंग फर्म. 1/2 वर्षे कामाचा अनुभव. संपर्कः- **9769988349** {NC261408}

वेस्टर्न/ सेन्ट्रल/ हार्बर लाइनसाठी हाऊसकीपिंग स्टाफ (मेल/फिमेल) पॅन्ट्रीबॉय, काऊंटर सेल्स स्टाफ पाहिजे. पगारः 14,000-25,000. "Sixth Sense FMS", Email: sixthsensefms@gmail.com. **9372416816/ 9136711601** {NC261383}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी/ टीचर/ गृहिणी पाहिजेत. (पगार+ पीएफ). **9604344895** {NC261363}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले व मुली पाहिजे. जय गणेश मेटलप्रिंट गाळा नंबर-6, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105 / 8879772701** {NC261207}

वायर मोल्डिंगसाठी (Injection Molding Machine Operator) BORIVALI EAST **9833755586** {NC261359}

4 कलर कोमोरी लिथ्रॉन ऑटोप्लेट 19 x 25 प्रिंटर, बॉलर, बाईंदर वृषाली प्रिंटर्स, 15, ज्योती इंडस्ट्रिज, नुरीबाबा दर्गा रोड, मखमली तलावाजवळ, ठाणे (प.) फोनः **9821096590** {NC261416}

सांताक्रुज वेस्ट स्टेशन जवळ लेडीज पर्सच्या शोरूमसाठी अनुभवी १) काऊंटर सेल्समेन कम हेल्पर २) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. संपर्क **9820117033.** {NC261455}

## पाहिजेत

१-२ वर्ष अनुभवी कस्टमर केयरसाठी बहुभाषिक (तामिळ+ इंग्रजीला प्राधान्य) महिलेची आवश्यकता आहे. पगार-15 ते 18 हजार वेळः 10 ते 7, प्रभादेवी. **9004344135** {NC261467}

हेडलबर्ग SM-74 फोर कलर ऑटोप्लेट ऑफसेट मशीनसाठी फिडरमॅन, पोलार कटिंग मशीनसाठी बाईंडर पाहिजेत. अंधेरी (पूर्व) साकीनाका संपर्क- **9820136761** {NC261468}

नवागाव, दहिसर पश्चिम येथे हेल्पर्स, वेल्डर्स, त्वरीत पाहिजेत. **9869050766 / 9619751090.** {NC261462}

अंधेरी ईस्टमध्ये कुरीयर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. ॲशियानेट लॉजिस्टिक **8097449888** {NC261463}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर- मुलुंड, वरळी, ठाणे, कोलशेत, दादर, गोवंडी मालाड, कर्जत- **8291056761/ 9082398403/ 7506129517/ 8422880515** {NC261464}

बोरीवली (ईस्ट)मध्ये ईमिटेशन कामासाठी मुले/मुली पाहिजेत **8850293018** {NC261465}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC261466}

मुलुंड येथील गारमेंट ऑफिसमध्ये ऑफिस / फिल्डवर्क/ डिलीव्हरीसाठी मुलगा/ मुलगी पाहीजेत. **9920563855/ 8104614956.** {NC261456}

JOGESHWARI येथे कामासाठी ऑफीस बॉय Peon पाहिजेत. (सॅलरी 12000/- 15000/-): Kunal Computers **9004211892** {NC261457}

अनुभवी इंग्लिश/मराठी ऑपरेटर पाहिजेत. 15,000/ 20,000/- पगार. ठाणे. **9221698776.** {NC261458}

अनुभवी सिक्युरिटी गार्ड (पुरुष/ महिला), सुपरवायझर, फील्ड ऑफीसर (बाईक असलेल्यांना प्राधान्य) व व्हॅलेट पाहिजेत. वय 40 वर्षांपेक्षा कमी तसेच किमान उंची ५ फूट ७ इंच असावी. ८ तास ड्युटी. कामाचे ठिकाणः कांदिवली व अंधेरी. संपर्कः **9821406617/ 9594871694** {NC261459}

## पाहिजेत

भायंदर वेस्टला LIC, Mutual Fund कामासाठी फिमेल आसिस्टंट पाहिजेत, कॉम्प्युटर आवश्यक. गांधी- **9320398149** {NC261460}

पदः ऑफिस बॉय (CA office) एन एम अँड कंपनी पत्ताः अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००६९ अनुभवः १-२ वर्षे. संपर्कः **+91-22-62369437, +91 9420799317** Email: info@nmkca.com {NC261461}

बारकोड-लेबल प्रिन्टींग मशीनसाठी सुपरवायझर, ऑफीस फिमेल असिस्टंट, हेल्पर पाहिजेत. गोरेगाव (इस्ट). **8104047320** {NC261453}

मालाड वेस्ट, काचपाडा, कंपनीला ऑफिसबॉय पाहिजे-15,000/-. संपर्क- **8591169969** {NC261449}

लिपिक पदासाठी पदवीधर उमेदवारांनी अर्ज करा. MS Office, इंटरनेट व ई-मेलचे ज्ञान आवश्यक. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य. बायोडाटा व कागदपत्रे ७ दिवसांत पाठवा. प्राचार्य, पंडित राजपती मिश्रा कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, ठाणे (पश्चिम) ई-मेलः panditrajpatimishra@gmail.com {NC261454}

विलेपार्ले पूर्व मध्ये फक्त संध्याकाळचे एका माणसाचे जेवण बनवण्यासाठी महिला पाहिजेत. मुंबई- **9324774986** {NC261452}

साकुराई/ स्क्रीन प्रिंटिंग/ स्पॉट UV मशीनसाठी ऑपरेटर पाहिजेत. पगार 20000- 25000+ OT. पन्नालाल कंपाउंड, भांडुप (प.) **9619585411/ 7021415320** {NC261450}

ग्रान्टरोड येथे घरकाम/ स्वयंपाकासाठी महिला पाहिजे. ३ तासासाठी पगार-10,000+ रेल्वे पास. **9324706082** {NC261442}

ग्रान्टरोड येथे इलेक्ट्रीक कामासाठी हेल्पर/ ईलेक्ट्रीशियन/ वायरमेन पाहिजेत पगार- 12000- 18000. **8879759555** {NC261442}

बँकेच्या रिकव्हरीसाठी मुले (टेलिकॉलिंग/ Field Executives) पाहीजेत. संपर्कः प्रसाद - **8356966358** {NC261445}

हॉस्पिटल मेंटेनससाठी PWD इलेक्ट्रिक वायरमन त्वरित पाहिजेत. PH- **9619918530/ 9223268970** {NC260033}

पॅकींगसाठी महिला हवी. लोहार चाळ, क्रॉफर्ड मार्केट. संपर्कः **022-35584387** {NC261443}

## पाहिजेत

कांदिवली (वेस्ट) फिटर, कारपेन्टर/ इलेक्ट्रीशियन पाहिजेत. (वय ३५ पर्यंत). संपर्कः **9930910500.** {NC261446}

५ वर्ष अनुभव असलेले इनोवा/ क्रिस्टा, एर्टिगा, डिझायर गाडी चालवणारे Driver पाहिजेत. पगार- 18000/-, लंच 150, डिनर 150, बाहेरगावचा भत्ता- 500- रोज, राहण्याची सोय. ''मस्तकार ट्रॅव्हलर्स'', शांताराम निवास, गोखले रोड (नॉर्थ) दादर- **9137227660** {NC261447}

मालाड वेस्ट, काचपाडा, कंपनीमध्ये सोल्डरींगसाठी एक्सपीरियन्स, फ्रेशर मुली पाहिजे- 15,000/-. संपर्क- **8591169969** {NC261448}

## Situation Vacant

Req. Interior Designer Female 0/1 year experience, Vileparle **9892692693.** {NC261375}

## Situation Vacant

**REQUIRED PEON/ OFFICE BOY AT PRABHADEVI MINIMUM 10TH STANDARD, MUST BE ABLE TO UNDERSTAND ENGLISH AND SPEAK FLUENT MARATHI MOBILE 9167308260 / 022-35728341** {NC261424}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC261296}

मुंबई येथील पेपरप्लेट होलसेलरला योग्य दरात पेपरप्लेट विकत घ्यायचे आहेत. तरी पेपरप्लेट मॅन्युफॅक्चरनी संपर्क साधावा. संपर्क **9870233400** {NC261444}

इन्कम टॅक्स रिटर्न सॅलरी डॉक्युमेंट बिजनेस प्रोफाइल बनवून मिळेल: **7715096161** {NC261395}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता कोर्स पेशंटकेअर/ डिप्लोमा पेशंटकेअर (नर्सिंग) MLT/ DMLT/ ऑपरेशन थिएटर Physiotherapist कोर्स. 100% Job Guarantee. Contact: Dr. Shrivastav: **9769116609/ 9702029738.** Lmp paramedical- Borivali {NC261382}

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## विवाहविषयक

लग्नाकरिता गरीब मुला मुलींची मोफत नावे नोंदणी. लावण्या- **7045943167** कविता- **7977883961** {NC261121}

## वर पाहिजे

गरीब घरची वधू, 28,12वी, कापड दुकानात काम,15000/- आई वडील नाही, काका-काकूकडे राहते, अपेक्षा कष्टाळू समजूतदार मुलगा हवा, जातीची शिक्षणाची अट नाही, (त्वरित विवाह). **7350589284** {NC261451}


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'

# सुनेत्रा पवार गुंगी गुडिया! काँग्रेसची खोचक टीका

पान १ वरून

मला हुकूमशहा कसे म्हटले जाते? मी गेल्या अडीच वर्षांपासून माध्यमांसमोर बोलणे टाळत आहे. सध्या माझ्याकडे कोणतेही मंत्रिपद नाही, मी फक्त एक आमदार आहे. तरीही माझ्याबद्दल इतका द्वेष का? एखाद्याला ठरवून टार्गेट करण्याची ही पद्धत आहे. सुनेत्रा वहिनींबद्दल काँग्रेसच्या मनात किती द्वेष आहे, हे यातून दिसते. काँग्रेसने हे विसरू नये की, इंदिरा गांधी प्रथम पंतप्रधान झाल्या, तेव्हा विरोधक त्यांनाही 'गुंगी गुडिया' म्हणायचे. मात्र, त्यांनी देशाची उत्तम सेवा करून दाखवली. सुनेत्रा वहिनीही आपले दुःख विसरून महाराष्ट्रातील जनतेची तशीच सक्षमपणे सेवा करून विरोधकांना चोख उत्तर देतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, काँग्रेसचे नेते अत्यंत खालच्या स्तरावर उतरले आहेत. त्यांना कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने आणि कोणी विचारत नसल्याने ते केवळ चर्चेत राहण्यासाठी अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत. 'बदनाम हुए तो क्या हुआ, नाम तो हुआ' अशा मानसिकतेतून हे सुरू आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारी वक्तव्ये पहिल्यांदाच पाहायला मिळत आहेत.

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, जनतेने काँग्रेसला आधीच त्यांची जागा दाखवून घरी बसवले आहे. त्यांनी केवळ सुनेत्रा पवार यांचाच नाही, तर राज्यातील सर्व महिलांचा अपमान केला आहे. काँग्रेसची बुद्धी भ्रष्ट झाली आहे का? अशाच वक्तव्यांमुळे काँग्रेसला पुन्हा पुन्हा जनतेने नाकारले आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसवर टीका केली. त्या म्हणाल्या की, गुंगी गुडिया? काय ही भाषा? एका पक्षाला ही भाषा शोभते का? पृथ्वीराज चव्हाण यांना ही भाषा योग्य वाटते का? मी राष्ट्रवादी पक्षाविरुद्ध टोकाचे लढले. पण सुनेत्रा पवारांसाठी वापरलेले हे शब्द अतिशय चुकीचे आहेत. मी याचा तीव्र शब्दांत निषेध करते.

हर्षवर्धन सपकाळ यांनी मात्र काँग्रेसच्या भूमिकेचे समर्थन केले. पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, 'गुंगी गुडिया' ही कोणतीही शिवी नाही, तर त्यांच्या भूमिकेचे वर्णन आहे. त्या अनेक विषयांवर बोलत नाहीत. अजित पवारांच्या अपघातावर अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही, तरी त्या काही बोलत नाहीत. त्यांना अद्याप अर्थखाते मिळालेले नाही, त्यावरही त्या गप्प आहेत. भाजपा त्यांच्या अधिकारांवर आणि त्यांच्या पक्षातील लोकांच्या अधिकारांवर गदा आणत असतानाही त्या काही बोलत नाहीत. एकंदरीत त्यांनी जे बोलणे थांबवले आहे, जो मुकेपणा त्यांनी स्वीकारला आहे, तो उपमुख्यमंत्रिपदाला अशोभनीय आहे. अजित दादांसारख्या खमक्या नेत्यासोबत काँग्रेसचे मतभेद आणि वैचारिक संघर्ष होते. मात्र त्यांच्या नेतृत्वाबाबत कुठलीही शंका उपस्थित होऊ शकत नाही. अशा एका बाणेदार आणि परखड नेत्याच्या पक्षाचे नेतृत्व करणारी व्यक्ती जर काहीच बोलत नसेल, तर काँग्रेस पक्षाने केलेले त्यांचे वर्णन अत्यंत योग्य आहे. एकेकाळी इंदिरा गांधींनाही 'गुंगी गुडिया' म्हटले गेले होते. मात्र, त्यांनी आपल्या कर्तृत्वातून स्वतःला असे सिद्ध केले की, अटल बिहारी वाजपेयींसारख्या नेत्यालाही त्यांना 'दुर्गा' म्हणावे लागले. आज आम्हीही सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हटले आहे. आता तातडीने स्वतःकडे अर्थखाते घ्यावे, अजित पवार यांच्या अपघाताचा तपास पूर्ण होईपर्यंत शांत बसणार नाही अशी भूमिका घ्यावी, 'लाडकी बहीण' योजनेचे अनुदान १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करावे आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय तातडीने घेऊन आपण 'दुर्गा' असल्याचे सिद्ध करावे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारही स्पष्टच म्हणाले की, काँग्रेस माफी मागणार नाही. आम्ही काहीही चुकीचे बोललो नाही. जे करायचे ते करा.

हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असताना अजित पवार गटाचे नेते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली १५ ते २० कार्यकर्त्यांनी थेट काँग्रेस कार्यालयात घुसले व सुनेत्रा वहिनींबद्दल असा शब्द वापरणे चुकीचे आहे, असे म्हणत त्यांनी सपकाळ यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजीही केली. त्यानंतर पोलिसांनी या आंदोलकांना ताब्यात घेत कार्यालयाबाहेर सुरक्षा वाढवली.

पत्रकार परिषदेतील या राड्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसने एक्स पोस्ट करत म्हटले की, राष्ट्रवादीच्या गुंड कार्यकर्त्यांनी मुंबईतील गांधी भवन या काँग्रेस कार्यालयात घुसून घोषणाबाजी करणे, दहशत माजवण्याचा प्रयत्न करणे अत्यंत निषेधार्ह आहे. बीडमध्ये दडपशाही करून यांचे मन भरत नाही. सूरज चव्हाण हा कोणाच्या आदेशावरून गांधी भवनात राडा करायला आला? याचा राष्ट्रवादीच्या नेतृत्वाने विचार करायला हवा. आमच्या कार्यालयात येऊन असली गुंडगिरी काँग्रेस पक्ष कधीही खपवून घेणार नाही. जशास तसे उत्तर देण्यात येईल.

## गुंगी गुडिया ते आयर्न लेडी

१९६६ मध्ये लालबहादूर शास्त्री यांच्या आकस्मिक निधनानंतर इंदिरा गांधी देशाच्या पहिल्यांदा पंतप्रधान बनल्या. काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांना हे आवडले नव्हते. त्यावेळी त्या फार बोलत नसत. शांत असत. त्यामुळे समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांनी त्यांना उपहासाने 'गुंगी गुडिया' असे संबोधले. त्यानंतर हे शब्द बराच काळ त्यांचे वर्णन करण्यासाठी वापरले जात. परंतु नंतर इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द यासारखे काही कठोर निर्णय घेतले. १९७१ मधील बांगलादेश युद्धातील विजयानंतर त्यांना आयर्न लेडी असे संबोधण्यात येऊ लागले.

# आजचे राशी भविष्य

बुधवार ता. ५ ऑगस्ट २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | अनेक अडचणींवर मात करण्यात यश मिळेल. घरात धार्मिक कार्याचे आयोजन कराल. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. |
| वृषभ | योजलेल्या कामांमध्ये अचानक बदल होण्याची शक्यता राहील. प्रवास करावा लागेल. रागावर नियंत्रण आवश्यक. |
| मिथुन | आधी केलेल्या गुंतवणुकीतून फायदा होईल. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. नातेवाईकांचे सौख्य चांगले लाभेल. |
| कर्क | कार्यक्षेत्रात नवीन संधी येण्यासाठी थोडी वाट पाहावी लागेल. कामाचा ताण जाणवेल मात्र आर्थिक लाभ होणार आहेत. |
| सिंह | सिंह रास-- भाग्याची साथ राहील. अनेक अडचणी दूर झाल्यामुळे सम १धान मिळेल.आवडत्या भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कन्या | आर्थिक नुकसान होऊ शकते. व्यवहार जपून करावेत. प्रवासादरम्यान आरोग्याची काळजी घ्यावी. |
| तूळ | सामाजिक कार्यात दानधर्म कराल. विवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल काळ. मित्रमंडळींकडून भेटवस्तू मिळतील. |
| वृश्चिक | नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांना अनुकूल काळ. जोडीदाराशी वाद टाळावेत. |
| धनु | महत्त्वाच्या कामात सफलता मिळेल. नवीन ओळखीचा फायदा होईल. धार्मिक स्थळी भेट देण्याचा योग येईल. |
| मकर | घरात एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन कराल. नातेवाईकांच्या गाठीभेटी होतील. नोकरीत नवीन संधी मिळेल. |
| कुंभ | कार्यक्षेत्रात नवीन कामे सुरू होणार आहेत.अधिक परिश्रम घ्यावे लागतील. आर्थिक व्यवहार जपून करावेत. |
| मीन | मालमत्ते संबंधित कामांमध्ये सफलता मिळेल. वडिलधाऱ्या मंडळींचे सहाय्य लाभेल. खाण्याची पथ्ये सांभाळावीत. |

# लॉटरी

## महाराष्ट्र पद्मीनी विकली लॉटरी

सोडत दर मंगळवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 31 | सोडत दिनांक 04/08/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **PM-03 : 3382**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **3382** — महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 7000/- — **1297** — श्री सिद्धि समर्थ एन्टरप्रायझेस, दादर - मुंबई

तिसरे बक्षिस रु. 5000/- — **4979** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; सुमित एजन्सी - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1170 | 1780 | 3098 | 3160 | 3371 | 3901 | 6140 | 7124 | 7547 | 7803 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1517 | 2387 | 3510 | 4652 | 5270 | 5768 | 6330 | 6388 | 7242 | 7520 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1978 | 2249 | 2590 | 3288 | 3511 | 5686 | 6122 | 6562 | 7005 | 7422 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1017 | 1404 | 1810 | 2287 | 2610 | 3239 | 3616 | 4290 | 4760 | 5252 | 5727 | 6361 | 6989 | 7687 |
| 1018 | 1412 | 1818 | 2289 | 2624 | 3258 | 3629 | 4302 | 4780 | 5262 | 5728 | 6388 | 7052 | 7692 |
| 1021 | 1431 | 1819 | 2292 | 2625 | 3281 | 3640 | 4344 | 4784 | 5285 | 5754 | 6400 | 7071 | 7699 |
| 1030 | 1447 | 1849 | 2294 | 2703 | 3294 | 3668 | 4348 | 4812 | 5301 | 5755 | 6417 | 7073 | 7701 |
| 1056 | 1471 | 1855 | 2299 | 2761 | 3296 | 3737 | 4353 | 4836 | 5331 | 5791 | 6506 | 7077 | 7705 |
| 1097 | 1478 | 1880 | 2326 | 2762 | 3307 | 3779 | 4404 | 4839 | 5415 | 5816 | 6520 | 7158 | 7721 |
| 1101 | 1481 | 1916 | 2344 | 2778 | 3312 | 3812 | 4405 | 4843 | 5451 | 5857 | 6566 | 7165 | 7748 |
| 1111 | 1488 | 1917 | 2345 | 2790 | 3330 | 3813 | 4406 | 4913 | 5458 | 5865 | 6576 | 7266 | 7768 |
| 1114 | 1491 | 1954 | 2352 | 2802 | 3346 | 3832 | 4428 | 4941 | 5460 | 5890 | 6600 | 7272 | 7779 |
| 1116 | 1510 | 2029 | 2389 | 2813 | 3354 | 3833 | 4429 | 4946 | 5480 | 5895 | 6613 | 7278 | 7782 |
| 1146 | 1517 | 2031 | 2391 | 2836 | 3358 | 3931 | 4431 | 4951 | 5485 | 5917 | 6639 | 7328 | 7784 |
| 1150 | 1521 | 2049 | 2410 | 2875 | 3364 | 3933 | 4483 | 4985 | 5507 | 5919 | 6653 | 7385 | 7792 |
| 1159 | 1522 | 2073 | 2421 | 2897 | 3375 | 3939 | 4492 | 4994 | 5524 | 5939 | 6664 | 7390 | 7793 |
| 1162 | 1535 | 2125 | 2423 | 2914 | 3393 | 4041 | 4504 | 5016 | 5534 | 5955 | 6668 | 7403 | 7798 |
| 1176 | 1544 | 2129 | 2441 | 2918 | 3433 | 4045 | 4530 | 5020 | 5535 | 5967 | 6718 | 7410 | 7870 |
| 1179 | 1551 | 2162 | 2446 | 2942 | 3471 | 4051 | 4544 | 5029 | 5545 | 5984 | 6737 | 7415 | 7924 |
| 1198 | 1563 | 2163 | 2450 | 2948 | 3473 | 4076 | 4556 | 5037 | 5557 | 6000 | 6802 | 7417 | 7928 |
| 1202 | 1576 | 2167 | 2473 | 3010 | 3487 | 4094 | 4559 | 5058 | 5580 | 6037 | 6806 | 7427 | 7943 |
| 1229 | 1589 | 2178 | 2479 | 3019 | 3488 | 4104 | 4637 | 5059 | 5585 | 6112 | 6857 | 7478 | 7959 |
| 1292 | 1599 | 2191 | 2496 | 3033 | 3556 | 4116 | 4648 | 5092 | 5622 | 6125 | 6863 | 7500 | 7961 |
| 1330 | 1625 | 2217 | 2525 | 3036 | 3559 | 4169 | 4677 | 5148 | 5650 | 6162 | 6886 | 7543 | 7971 |
| 1352 | 1641 | 2229 | 2544 | 3039 | 3567 | 4175 | 4708 | 5155 | 5655 | 6191 | 6913 | 7600 | 7976 |
| 1353 | 1716 | 2244 | 2562 | 3067 | 3583 | 4245 | 4724 | 5156 | 5679 | 6204 | 6956 | 7619 | 7977 |
| 1371 | 1721 | 2252 | 2582 | 3219 | 3605 | 4267 | 4745 | 5159 | 5689 | 6273 | 6962 | 7657 | 7982 |
| 1385 | 1730 | 2261 | 2600 | 3228 | 3613 | 4277 | 4754 | 5188 | 5699 | 6304 | 6968 | 7677 | 7987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ५/८/२०२६

| ५ | १ | ६ |
|---|---|---|
| ५२ | १२ | ६२ |
| ५७ | १७ | ६७ |
| १६८ | १३७ | १२६ |
| २३० | २३६ | २३६८ |

## निकाल — गणेशलक्ष्मी शुभ विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 31 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/08/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-04 : 6885**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 7000/- — **1014** — ₹ 7000 ची 5 बक्षिसे = 35,000/- जिंकले — महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी

तिसरे बक्षिस रु. 5000/- — **0244**

चौथे बक्षिस रु. 2000/- — **6538**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1556 | 2205 | 2826 | 3043 | 4017 | 5808 | 6122 | 7059 | 7610 | 9625 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1893 | 3444 | 3663 | 4185 | 4385 | 7225 | 8956 | 9461 | 9491 | 9500 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1757 | 2452 | 3178 | 4001 | 5151 | 5928 | 7331 | 8139 | 9124 |
| | | 1963 | 2483 | 3247 | 4013 | 5199 | 6062 | 7353 | 8218 | 9134 |
| 0006 | 1164 | 2128 | 2544 | 3322 | 4164 | 5217 | 6110 | 7367 | 8253 | 9306 |
| 0026 | 1212 | 2153 | 2648 | 3349 | 4175 | 5305 | 6194 | 7372 | 8280 | 9349 |
| 0062 | 1257 | 2217 | 2714 | 3382 | 4184 | 5385 | 6201 | 7408 | 8289 | 9397 |
| 0140 | 1272 | 2223 | 2750 | 3396 | 4264 | 5399 | 6216 | 7453 | 8451 | 9412 |
| 0448 | 1333 | 2224 | 2810 | 3409 | 4288 | 5445 | 6296 | 7472 | 8466 | 9425 |
| 0509 | 1357 | 2229 | 2843 | 3417 | 4331 | 5497 | 6553 | 7493 | 8646 | 9440 |
| 0639 | 1391 | 2263 | 2878 | 3423 | 4417 | 5513 | 6577 | 7687 | 8678 | 9490 |
| 0675 | 1460 | 2272 | 2922 | 3427 | 4446 | 5520 | 6626 | 7712 | 8685 | 9499 |
| 0695 | 1581 | 2274 | 2926 | 3438 | 4449 | 5550 | 6667 | 7830 | 8711 | 9613 |
| 0804 | 1618 | 2287 | 2967 | 3503 | 4492 | 5608 | 6756 | 7944 | 8858 | 9849 |
| 0866 | 1624 | 2330 | 3071 | 3586 | 4572 | 5717 | 6864 | 8037 | 8883 | 9933 |
| 1109 | 1687 | 2355 | 3117 | 3793 | 4574 | 5731 | 6911 | 8082 | 8884 | 9936 |
| 1149 | 1708 | 2358 | 3140 | 3813 | 4904 | 5799 | 7251 | 8101 | 8978 | 9970 |
| | | 2370 | 3149 | 3838 | 4943 | 5857 | 7262 | 8138 | 9112 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 31 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/08/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-06 : 3824**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **5530** — ₹ 5000 ची 5 बक्षिसे = 25,000/- जिंकले — पवार लॉटरी - ठाणे

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **1860**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1688 | 3001 | 3182 | 3263 | 3531 | 4344 | 5190 | 5409 | 5736 | 5948 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1196 | 1339 | 1499 | 2333 | 2561 | 3055 | 4249 | 4800 | 5499 | 5661 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1027 | 1405 | 1859 | 2397 | 2707 | 3159 | 3948 | 4524 | 5140 | 5569 |
| 1069 | 1410 | 1942 | 2439 | 2748 | 3226 | 4043 | 4776 | 5262 | 5595 |
| 1108 | 1491 | 1968 | 2472 | 2833 | 3422 | 4103 | 4797 | 5268 | 5599 |
| 1132 | 1613 | 1977 | 2476 | 2905 | 3425 | 4192 | 4875 | 5298 | 5604 |
| 1155 | 1614 | 1981 | 2480 | 2921 | 3496 | 4227 | 4922 | 5375 | 5644 |
| 1227 | 1661 | 2012 | 2519 | 2924 | 3526 | 4340 | 4948 | 5403 | 5651 |
| 1233 | 1767 | 2059 | 2565 | 3053 | 3528 | 4347 | 4952 | 5429 | 5652 |
| 1337 | 1786 | 2082 | 2583 | 3079 | 3700 | 4349 | 4983 | 5453 | 5682 |
| 1346 | 1791 | 2250 | 2602 | 3130 | 3789 | 4439 | 5033 | 5528 | 5881 |
| 1371 | 1840 | 2280 | 2677 | 3138 | 3930 | 4478 | 5055 | 5535 | 5957 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • महालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 31 • तिकिट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 04/08/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SM-02 : 1114**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2866**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1223 | 1442 | 1875 | 1935 | 2532 | 2775 | 4259 | 4568 (कपिल असोसिएट्स, कोल्हापूर) | 5530 | 5980 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1381 | 1897 | 2989 | 3173 | 3908 | 4773 | 4832 | 4921 | 5022 | 5566 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1801 | 2099 | 3299 | 3736 | 3761 | 4172 | 4323 | 4324 | 5015 | 5017 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2070 | 2824 | 3328 | 3937 | 4437 | 5372 |
| | | 2101 | 2829 | 3369 | 3987 | 4496 | 5466 |
| 1061 | 1617 | 2131 | 2910 | 3448 | 4092 | 4517 | 5501 |
| 1087 | 1652 | 2179 | 2924 | 3470 | 4204 | 4644 | 5546 |
| 1143 | 1656 | 2181 | 2925 | 3493 | 4220 | 4774 | 5590 |
| 1155 | 1702 | 2196 | 3034 | 3502 | 4225 | 4825 | 5656 |
| 1161 | 1729 | 2220 | 3035 | 3523 | 4298 | 4848 | 5664 |
| 1165 | 1756 | 2225 | 3092 | 3535 | 4306 | 4854 | 5667 |
| 1219 | 1801 | 2257 | 3136 | 3555 | 4311 | 4942 | 5687 |
| 1264 | 1817 | 2283 | 3236 | 3573 | 4370 | 4949 | 5799 |
| 1366 | 1912 | 2362 | 3299 | 3660 | 4400 | 5057 | 5895 |
| 1491 | 1951 | 2471 | 3307 | 3681 | 4401 | 5279 | 5958 |
| 1610 | 2010 | 2552 | 3314 | 3841 | 4407 | 5281 | 5995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


# कमला नेहरू

**पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या पत्नी कमला नेहरू यांच्याविषयी लेखिका महादेवी वर्मा यांनी सांगितलेली एक आठवण मनाला खोलवर स्पर्श करून जाते. त्यांच्या स्मरणानुसार, कमला नेहरूंच्या निधनानंतर पंडित नेहरूंनी आपल्या प्रिय पत्नीच्या अस्थींचा राखरूपी एक अंश चांदीच्या छोट्याशा डबीत जपून ठेवला होता. ते जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी ती डबी सोबत बाळगत असत. त्यांच्या दृष्टीने ती केवळ राखेची डबी नव्हती, अथवा निव्वळ स्मृतींचे प्रतीक म्हणून जपून ठेवलेली साठवणही नव्हती! तो त्यांच्या उर्वरित सहजीवनाचा गंधभरीत श्वास होता. सार्वजनिक जीवनात कोट्यवधी लोकांचा नेता असलेला हा माणूस, एकांतात मात्र आपल्या आयुष्याच्या अर्ध्या भागाला अशा शांतपणे जवळ बाळगून जगत होता. राष्ट्राच्या भविष्याचा विचार करणाऱ्या त्या विशाल मनात एका पतीचे असहाय दुःखही तितक्याच खोलवर जिवंत होते.**

**महादेवी** वर्मांनी ह्याच स्मरणनोंदीत कवी सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' यांच्या जीवनाचीही आठवण मांडली आहे. वयाच्या विसाव्या वर्षी निराला यांच्या पत्नी मनोहरा देवी यांचे निधन झाले. त्यांच्यापासून त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाली.

मुलगी सरोज मोठी झाली, तिचे लग्न अठराव्या वर्षी झाले आणि लग्नानंतर दीड वर्षात तिचे निधन झाले. तिच्या स्मरणार्थ त्यांनी 'सरोज स्मृती' लिहिल्या आहेत! पत्नीचे निधन हा त्यांच्यासाठी इतका मोठा आघात होता की, मुलं नसती तर त्यांचे जगणे कठीण होते! मुलगी सरोज हिच्यात त्यांनी आपल्या पत्नीला पाहिले! तिला त्यांनी आईचे प्रेम दिले! विरहाच्या वेदनेने त्यांची कविता अधिक करुण, अधिक मानवी झाली. एका बाजूला राष्ट्राचा नेता आपल्या प्रिय सहचारिणीच्या स्मृतीची चांदीची डबी जपत होता; तर दुसऱ्या बाजूला एक कवी आपल्या अंतःकरणात दुःखाची राख घेऊन आयुष्यभर शब्दांचे दीप लावत होता. वेदनेची रूपे वेगवेगळी असली, तरी तिचा रंग मात्र एकच असतात; मूक, गहिरा आणि शाश्वत. असो.

कमला नेहरू यांच्याविषयी फार काही लिहिले जात नाही; अथवा डिजिटल मीडियामध्ये त्यांच्याविषयीची साधने कमी असावीत. इतिहासाला नेहमीच मोठी नावे अधिक आवडतात. सर्व प्रकारच्या इतिहासास महान लोकांच्या विजयाच्या घोषणा, राजकीय भाषणे आणि क्रांतीची गाज आठवते. पण इतिहासाच्या प्रत्येक उज्ज्वल पानामागे काही निःशब्द छाया दडलेल्या असतात. त्या स्वतः प्रकाशझोतात येत नाहीत. मात्र दुसऱ्यांच्या तेजाला अखंड ऊर्जा पुरवत राहतात. कमला नेहरू हे असेच एक व्यक्तिमत्त्व. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांचे नाव जवाहरलाल नेहरू यांच्या सहचारिणी म्हणून घेतले जाते. परंतु त्यांची खरी ओळख त्याग, संयम, करुणा आणि अदम्य राष्ट्रनिष्ठा यांत दडलेली आहे.



आजच्या तारखेस १ ऑगस्ट १८९९ रोजी दिल्लीतील एका सुसंस्कृत काश्मीरी पंडित कुटुंबात कमला कौल यांचा जन्म झाला. घरात संस्कारांची समृद्ध परंपरा होती; पण त्या काळातील सामाजिक संकेतांमुळे मुलींच्या शिक्षणावर अनेक बंधने होती. घरगुती शिक्षण, संस्कृती आणि मूल्यांची शिदोरी घेऊन त्या वाढल्या. त्यांच्या स्वभावात एक विलक्षण शांतताप्रिय शिस्त होती; ती शांतता इतकी संयमी होती की, संकटांच्या काळातही तिने कमलाबेनला निग्रहापासून कर्तव्यापासून ढळू दिले नाही.

१९१६ मध्ये त्यांचा विवाह जवाहरलाल नेहरू यांच्याशी झाला. आनंद भवनात प्रवेश करताना त्यांनी केवळ एका नव्या घरात नव्हे, तर एका नव्या युगात पाऊल ठेवले. आधुनिक विचार, राजकीय चर्चा, स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण आणि सतत कोणत्या ना कोणत्या उपक्रमात व्यस्त असणारे सार्वजनिक जीवन, हे सारे त्यांच्यासाठी नवे होते. पण त्यांनी कोणतीही खळखळ न करता स्वतःला त्या वातावरणाशी जुळवून घेतले. भारतीय स्त्रीची साधी, स्वाभिमानी आणि सोज्वळ ओळख त्यांनी कधीच सोडली नाही.

**- समीर गायकवाड**

१९१७ मध्ये त्यांच्या पोटी, इंदिरा प्रियदर्शिनी यांचा जन्म झाला. पुढे १९२४ मध्ये जन्मलेला पुत्र अवघ्या दोन दिवसांत जगाचा निरोप घेऊन गेला. मातृत्वाच्या या जखमेने कमला नेहरूंच्या अंतःकरणावर कायमचा ओरखडा उमटवला. त्यानंतर क्षयरोगाने त्यांच्या शरीराला पोखरायला सुरुवात केली; पण मनातील जिद्द मात्र कमी झाली नाही.

महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनाने त्यांच्या जीवनाला नवी दिशा दिली. परदेशी कापडाच्या दुकानांपुढील निदर्शने, स्वदेशीचा प्रचार, महिलांना संघटित करण्याचे प्रयत्न आणि सविनय कायदेभंग आंदोलनातील सहभाग, या सर्वांमध्ये त्या अग्रभागी राहिल्या. जवाहरलाल नेहरू तुरुंगात असताना त्यांनी अनेक सार्वजनिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. ब्रिटिश सरकारने त्यांनाही अटक केली. परंतु आजारपणाने थकलेल्या शरीरानेही स्वातंत्र्याच्या स्वप्नाला साथ सोडली नाही.

त्यांचे वैयक्तिक जीवन मात्र विरहाने व्यापलेले होते. जवाहरलाल नेहरूंचे आयुष्य आंदोलने, राजकीय दौरे आणि कारावासात जात होते. पती-पत्नीचा संवाद अनेकदा पत्रांतून घडत असे. त्या पत्रांत उत्कटतेपेक्षा विश्वास होता; शब्दांपेक्षा न बोललेल्या भावनांचा प्रभाव वजन अधिक होता. कमला नेहरूंनी घर सांभाळले, मुलीला घडवले आणि राष्ट्रकार्यात स्वतःला झोकून दिले; पण स्वतःच्या वेदनांविषयी त्यांनी कधी कुठे मत मांडले नाही.

क्षयबाधेने आरोग्य सतत खालावत गेल्याने उपचारासाठी त्या विदेशात गेल्या. तिथल्या हिमाच्छादित पर्वतांच्या शांत सान्निध्यातही त्यांचे मन भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातच गुंतलेले राहिले. अखेर २८ फेब्रुवारी १९३६ रोजी लॉझान येथे त्यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय अवघे छत्तीस वर्षांचे होते. एका राष्ट्रभक्त स्त्रीचा प्रवास तेथे संपला; पण एका पतीच्या आयुष्यातील न भरून येणारा विरह तेव्हाच सुरू झाला. महादेवी वर्मा यांनी सांगितलेली आठवण ह्या दृष्टीने विलक्षण आर्त आहे! कमलांचे निधन झाले तेव्हा जवाहरने पुनर्विवाह करावा म्हणून त्यांच्या कुटुंबात आग्रह झाला. मात्र जवाहरनी त्यास ठाम नकार दिला.

कमला नेहरूंचे आयुष्य, हे जवाहरलाल नेहरूंनी सोबत बाळगलेल्या शांत अबोल वेदनेचे प्रतीक होय. आपल्या सामाजिक राजकीय जीवनात त्यांनी कोणतीही मोठी राजकीय पदे भूषवली नाहीत, प्रसिद्धी कीर्तीचा आग्रह धरला नाही, स्वतःसाठी इतिहासात स्पेस मागितली नाही. त्यांनी अतिशय अंतःकरणपूर्वक आणि निष्ठेने आपले कर्तव्य पार पाडले.

एक पत्नी म्हणून, आई म्हणून, स्वातंत्र्यसैनिक म्हणून आणि समाजसेविका म्हणून, त्यांनी विविध भूमिका समर्पण भावनेने पार पाडल्या. अनेकदा इतिहासातील सर्वांत मोठी कर्तृत्ववान व्यक्तिमत्वे गाजावाजा झाल्याशिवाय लोकांसमोर उजळून निघत नाहीत हेही एक वास्तव आहे! कमलांसोबत असे घडले असावे.

आज कमला नेहरूंची आठवण काढताना त्यांच्या कार्याइतकीच महत्त्वाची वाटते, ती त्यांच्या आयुष्यातली भावस्पर्शी गहिरी शांतता. राष्ट्रासाठी झिजताना त्यांनी स्वतःचे सुख अर्पण केले. देशातल्या सर्वोच्च महत्त्वाच्या पदावर असणाऱ्या पतीने अगदी कारुण्य भावनेने त्यांच्या स्मृतीची राख आयुष्यभर जपली आणि एका साहित्यिकेने त्या प्रसंगाला शब्दकळा देऊन अमर केले. म्हणूनच कमला नेहरू ह्या स्वातंत्र्यलढ्यातील केवळ एक कार्यकर्त्या नव्हत्या; त्या प्रेम, त्याग, निष्ठा आणि स्मृती यांचा असा दीप होत्या, ज्याची ज्योत काळाच्या वाऱ्याने कधीच विझू शकली नाही. काही माणसे मृत्यूनंतर इतिहासात नोंदली जातात; काही माणसे मात्र आपल्या प्रियजनांच्या हृदयात आयुष्यभर जिवंत राहतात. कमला नेहरू त्या दुसऱ्या प्रकारातील होत्या. म्हणूनच त्यांची कथा संपत नाही. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर ती नव्याने सुरू होते; एखाद्या पत्रात, एखाद्या स्मृतीत, एखाद्या चांदीच्या डबीत जपलेल्या राखेत आणि एका विरहाने भरलेल्या शांत हृदयात त्यांची कथा आपल्याला नित्य जाणवत राहते! त्याग, निष्ठा, प्रेम आणि समर्पण ह्यांची नव्याने आठवण करून देत राहते!

२०१४ पर्यंत अत्यंत वाईट पद्धतीने काँग्रेसचा द्वेष केला याचे आता वाईट वाटते. काँग्रेसविरोधात उघड प्रचार केला याचे शल्य वाटते. हा कबुलीजबाब कमला नेहरूंच्या जयंतीदिनी द्यावा वाटतो. विवेक जागृत होतोय याचे समाधान आहे! देर आये दुरुस्त आये!

## कावड यात्रेमुळे मेरठमधील शाळा १० ऑगस्टपर्यंत बंद

■ मेरठ



**कावड** यात्रेमुळे उत्तर प्रदेशच्या अनेक जिल्ह्यांमधील शाळा बंद राहणार आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अनेक जिल्ह्यांतील टप्प्याटप्प्याने शाळांना सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. या यात्रेमुळे मेरठमधील सर्व शाळा १० ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला. ३० जुलै रोजी श्रावण महिना सुरू झाला असून श्रावण महिन्याचा मुख्य सण शिवरात्री ११ ऑगस्ट रोजी या जिल्ह्यात साजरा केला जाईल. हरिद्वारहून मोठ्या संख्येने यात्रेकरू आणि भाविक मेरठमार्गे प्रवास करतात. कावड मार्गांवरून यात्रेकरूंची वाहतूक आधीच सुरू झाली. त्यासाठी अनेक उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मेरठ जिल्ह्यातील सर्व शिक्षण मंडळांशी संलग्न असलेल्या इयत्ता १ ली ते १२ वीच्या शाळा १२ ऑगस्टपर्यंत पूर्णपणे बंद राहतील. यामध्ये प्राथमिक शिक्षण परिषद, माध्यमिक शिक्षण परिषद, सीबीएसई, आयसीएसई आणि इतर सर्व मान्यताप्राप्त मंडळांच्या शाळा, मदरसा मंडळाद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. याशिवाय या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठे आणि तांत्रिक शिक्षण संस्था (शासकीय आणि खाजगी दोन्ही) देखील १२ ऑगस्टपर्यंत बंद राहतील.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## जव्हारच्या दाभोसा धबधब्यावर दोन पर्यटक दरीत कोसळले

■ पालघर

**जिल्ह्यातील** जव्हार येथील प्रसिद्ध दाभोसा धबधब्यावर मोठी दुर्घटना टळली. जुनाट लोखंडी रेलिंग तुटल्याने दोन पर्यटक दरीत कोसळल्याची घटना घडली. यावेळी उपस्थित पर्यटक आणि वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य करून दोघांचे प्राण वाचवले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

या घटनेनंतर धबधबा परिसरातील गंजलेले रेलिंग आणि अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. तर याच धबधब्यासाठी यावर्षी दोन कोटीच्या आसपास खर्च केल्याची माहिती समोर आली आहे. पावसाळा सुरू असल्याने सध्या या धबधब्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. रविवारी सुट्टीच्या दिवशी दोन पर्यटक या धबधब्यावर निसर्गरम्य सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी आले होते. यावेळी हे दोघेही छायाचित्र काढण्यासाठी रेलिंगला टेकून उभे होते.

## देशातील औद्योगिक उत्पादन जुलैमध्ये कमालीचे घटले

**नवी दिल्ली-** देशाच्या उत्पादन क्षेत्रासाठी जुलै महिना निराशाजनक ठरला आहे. नवीन ऑर्डर्समध्ये झालेली संथ वाढ आणि आव्हानात्मक बाजारस्थितीमुळे उत्पादन क्षेत्राच्या वाढीचा वेग पाच वर्षांतील नीचांकी पातळीवर घसरला आहे. त्याचवेळी उद्योगांमधील रोजगारनिर्मितीही सलग तिसऱ्या महिन्यात मंदावली असून, गेल्या २९ महिन्यांतील हा सर्वात संथ वेग असल्याचे एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग पीएमआयच्या मासिक सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स म्हणजेच पीएमआय जूनमधील ५४.२ वरून जुलैमध्ये ५.५ वर घसरला.

## वसई-पालघरमधील पूरग्रस्तांना दिलासा शासनाकडून भरघोस आर्थिक मदत

■ वसई

**जुलै** महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त झालेल्या वसई-विरार आणि पालघर जिल्ह्यातील नागरिकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने काल संध्याकाळी यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी केला. या निर्णयानुसार पूरग्रस्त नागरिक, शेतकरी, मच्छीमार, दुकानदार, फेरीवाले तसेच मृत जनावरांच्या मालकांना विशेष आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

जुलैच्या पहिल्याच आठवड्यात झालेल्या विक्रमी पावसामुळे वसई-विरार आणि पालघर जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली होती. काही भागांत २४ तासांत ५०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली होती. या आपत्तीत सार्वजनिक मालमत्ता, घरे, वीज यंत्रणा, रस्ते तसेच नागरिकांच्या संसारोपयोगी वस्तूंचे मिळून सुमारे १८० कोटी रुपयांचे नुकसान झाले. १९ हजारांहून अधिक घरांमध्ये पाणी शिरले, तर यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात विविध दुर्घटनांमध्ये २३ जणांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर वसई-विरारचे महापौर अजीव पाटील आणि पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी मुख्यमंत्र्यांकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी केली होती. पूरग्रस्त आणि पाणी साचलेल्या भागांचा विशेष विचार करून राज्य शासनाने ही मदत मंजूर केली आहे. शासन निर्णयानुसार पूरामुळे बाधित व स्थलांतरित झालेल्या प्रत्येक कुटुंबाला २० हजार, पूर्णपणे कोसळलेल्या पक्क्या घरांसाठी १.५० लाख, तर नष्ट झालेल्या झोपड्यांसाठी १५ हजार मदत दिली जाणार आहे. दुकानदारांना नुकसानानुसार १० हजार ते ५० हजार, तर लहान टपरीधारकांनाही आर्थिक सहाय्य मिळणार आहे. पूर आणि वादळामुळे मृत झालेल्या जनावरांच्या मालकांना २० हजार ते ४० हजार, तर बोटींचे नुकसान झालेल्या मच्छीमारांना २५ हजार मदत दिली जाणार आहे.

## दरडग्रस्त घरांचे एमएमआरडीएने भाडे थकविले! शिवशाहीची माहिती

■ मुंबई

**दरडग्रस्त** रहिवाशांना राहाण्यासाठी दिलेल्या घरांचे भाडे एमएमआरडीएने दोन वर्षांपासून थकविले आहे, अशी माहिती शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयातील एका अधिकाऱ्याने दिली.

उपनगरात दरडीलगत राहणाऱ्या रहिवाशांना सुरक्षितस्थळी राहाण्यासाठी एमएमआरडीएने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाकडून चार वर्षांपासून भायखळा येथील १४० सदनिका भाडेतत्त्वावर घेतल्या आहेत. प्रत्येकी सदनिकांचे दरमहा आठ हजार रुपये भाडे आहे, असे सांगून अधिकारी पुढे म्हणाला, सदनिका ताब्यात घेतल्यावर एमएमआरडीएने वेळेवर न चुकता भाड्याची रक्कम शिवशाहीला अदा करता आली आहे. मात्र दोन वर्षाची भाड्याची रक्कम एमएमआरडीएकडे थकीत आहे.

एमएमआरडीए शासनाचा उपक्रम असल्याने त्यांच्याकडे थकीत भाड्याच्या रकमेसाठी तगादा लावता येत नाही किंवा ते भाडे देण्याचे सौजन्यही दाखवत नाहीत.

## विखे-पाटलांच्या राजीनाम्याची मागणी रोहित पवारांचे प्रेझेन्टेशन देत आरोप



■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एमएचटी-सीईटी परीक्षेतील गैरव्यवहाराबाबत आज येथे पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले. सादरीकरणाद्वारे त्यांनी आरोप केला की, परीक्षा प्रक्रियेत भ्रष्टाचार झाला असून, एपीएससीचा पेपर २५ लाख रुपयांना फुटल्याचे जबाबांमधून स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी भायखळा पोलीस ठाण्यात पाठपुरावा करणार आहे. उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित प्रकरणात अधिकचे पुरावे हाती लागले असून, मार्किंग पॅटर्न लीक झाले आहेत. एपीएससीसह तलाठी भरती प्रक्रियेतही गंभीर अनियमितता झाली आहे. या सर्व प्रकरणांबाबत संबंधित मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या राजीनाम्याची लवकरच मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार रोहित पवार यांनी आरोप केला की, हा सर्व काळाबाजार भाजपाच्या सत्ताकाळात झाला. दरवर्षी सुमारे १० लाख विद्यार्थी एमएचटी-सीईटी परीक्षा देतात. २०२० ते २०२६ या कालावधीतील निकालांचे विश्लेषण केल्यानंतर २०२३ पासून संशयास्पद पॅटर्न दिसून येत आहे. २०२३ पासून सीईटीच्या अव्वल १०० विद्यार्थ्यांमध्ये बारावीच्या पीसीएम गटात ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सातत्याने घटत आहे.

२०२६ मध्ये अव्वल १०० विद्यार्थ्यांपैकी केवळ ४३ विद्यार्थ्यांनाच बारावीत पीसीएममध्ये ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले होते.सीईटीमध्ये पर्सेंटाईल काढण्याचे सूत्र नेमके काय आहे, याची माहिती सीईटी सेलकडून दिली जात नाही. माहिती अधिकार कायद्यांतर्गतही ही माहिती उपलब्ध करून दिली जात नसल्याने पर्सेंटाइलचे सूत्र सार्वजनिक करण्याची करावी. परीक्षेचे कंत्राट एका विशिष्ट कंपनीला मिळावे यासाठी सीईटी सेलने तीन वेळा निविदेच्या अटी बदलल्या. 'एड्युसपार्क' या कंपनीला महाराष्ट्रातील सात विभागांमध्ये कामे मिळाली असून संबंधित कंपन्यांचे जाळे तयार करून त्यांनाच कंत्राटे देण्यात आली. बिहार सरकारनेही यासंदर्भात थेट पंतप्रधानांकडे तक्रार केली होती. कंपन्यांचे कार्टेल तयार करून कंत्राटे मिळवली जात असल्याचे निदर्शनास आल्याचा आरोपही त्यांनी केला.

## हुमायूनच्या कबरीवर प्रदूषणामुळे काळा थर

■ नवी दिल्ली



**दिल्लीतील** ऐतिहासिक हुमायूनच्या कबरीतील लाल दगडावर (सँडस्टोन) वायू प्रदूषणामुळे काळा थर जमा झाला आहे. तो या जागतिक वारसा स्थळाचे नुकसान करत आहे. आयआयटी रुरकी आणि आयआयटी कानपूर यांच्या संयुक्त संशोधनातून ही बाब उघड झाली आहे.

या मकबऱ्याच्या विविध भागांतून गोळा केलेल्या काळ्या थराच्या नमुन्यांची रासायनिक रचना, खनिजांचे प्रमाण आणि सूक्ष्म रचना यांची प्रयोगशाळेतील तंत्रांचा वापर करून तपासणी करण्यात आली. हा काळा थर काढण्यासाठी विशेष संवर्धन तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. दिल्लीतील वाढत्या वाहनांचे प्रदूषण आणि औद्योगिक धूर कमी करणे गरजेचे आहे. या हुमायूनच्या मकबऱ्याच्या संरक्षणासाठी आयआयटी सारख्या संस्थांच्या मदतीने सातत्याने निगराणी ठेवणे आवश्यक आहे.

## जम्मूमध्ये नारळाच्या करवंट्यांपासून कोको-पीट तयार केले जाणार

■ जम्मू

**जम्मूमध्ये** वापरलेल्या नारळाच्या शेंड्यांमधून पर्यावरणपूरक कोको-पीट (भुसा) तयार केले जाणार आहे. त्यासाठी जम्मू महापालिकेने भगवती नगरात 'कोकोनट श्रेडिंग युनिट' सुरू केले आहे. ही महापालिका संपूर्ण शहरातील नारळ विक्रेत्यांकडून करवंट्या गोळा केल्या जाणार आहे.

गोळा करण्याची प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून नोंदणीकृत नारळ विक्रेत्यांना पालिकेकडून विशेष ओळख स्टिकर्स दिले जातील. गोळा केलेल्या करवंट्या भगवती नगर येथील युनिटमध्ये आणून त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून दर्जेदार कोको-पीट तयार केले जाईल. पावसाळ्यात रस्त्यावरील किंवा कचराकुंडीतील नारळाच्या करवंट्या वाहून जाऊन ड्रेनेज आणि गटारे तुंबतात. या प्रकल्पामुळे शहरात तुंबणाऱ्या पाण्याचा हा प्रश्न सुटणार आहे. या युनिटमधून तयार होणारे कोको-पीट हे पर्यावरणपूरक असून, त्याचा वापर फलोत्पादन, लँडस्केपिंग आणि कंपोस्टिंगमध्ये (सेंद्रिय खत निर्मिती) मोठ्या प्रमाणावर केला जाईल.

जम्मू महापालिकेचे आयुक्त डॉ. देवांश यादव यांनी नागरिकांना आणि विक्रेत्यांना या मोहिमेत सहकार्य करण्याचे आणि कचऱ्याची जबाबदारीने विल्हेवाट लावण्याचे आवाहन केले आहे.

## अण्णा भाऊ साठे यांच्या कन्येचे निधन



■ नालासोपारा

**लोकशाहीर** कॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या द्वितीय कन्या शकुंतला अजित सपताल यांचे काल रविवारी पहाटे नालासोपारा येथील रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांना ब्रेनस्टोक झाल्यानंतर गेले काही दिवस त्यांच्यावर या रुग्णालयातच उपचार सुरू होते. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना ३ मुले होती. त्यांच्या दोन मुलांचे यापूर्वीच निधन झाले आहे.


कॉम्रेड शंकुतलाबाई या लहानपणापासून सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. त्या बाल संघात आणि सांस्कृतिक कला पथकात होत्या. तसेच पक्षाच्या मुखपत्रांची विक्री करण्यात आपली आई कॉ.जयवंताबाई साठे यांच्या समवेत आघाडीवर आघाडीवर होत्या. शकुंतला यांना एकूण ४ मुले आहेत. त्या मुलांकडे मुंबईत राहत होत्या. करोनानंतर त्या नालासोपारा येथे प्रशांत या त्यांच्या मुलाच्या घरी राहात होत्या. त्यांना ब्रेन स्ट्रोक झाल्यानंतर नालासोपारा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. रविवारी पहाटे त्यांचे निधन झाले. नालासोपारा येथे त्यांच्या पार्थिवावर जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार झाले.

## कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेला जळगावचा पाळधी पूल खचला

■ जळगाव

**शहरातील** वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि प्राणघातक अपघात टाळण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेला तरसोद ते पाळधी हा बायपास पूल वर्षभरातच खचला आहे. या दोन पदरी बायपासवरील पुलाचे पिलर ढासळले असून, रस्त्याला भल्या मोठ्या भेगा पडल्या आहेत. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे हा भीषण प्रकार घडला असून, सुदैवाने ऐन वाहतुकीच्या वेळी पूल खचला नसल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळली.

मुंबई - नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ला जोडणाऱ्या या बायपास पुलाचे बांधकाम राष्ट्रीय महामार्ग



प्राधिकरणाने ठेकेदाराकडून करून घेतले होते. मात्र, पहिल्याच मुसळधार पावसात पुलाच्या पिलरचे बांधकाम कोसळून पिलर थेट उघडे पडल्याने ठेकेदाराच्या कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## पुण्यात चिखलामुळे १०-१५ वाहने घसरली

■ पुणे

**पुणे** शहरात झालेल्या पावसामुळे नायडू हॉस्पिटल परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला. त्यामुळे रस्ता निसरडा होऊन तब्बल १० ते १५ वाहनांना अपघात झाला. त्यानंतर अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन पाण्याच्या फवाऱ्याने रस्ता स्वच्छ केला. तसेच या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले.

आरटीओ चौक ते नायडू हॉस्पिटलदरम्यानच्या रस्त्यावर पावसामुळे मोठ्या प्रमाणात चिखल साचला होता. या चिखलातून वाहन चालवताना वाहनचालकांचे नियंत्रण सुटत होते. त्यामुळे काही दुचाकी घसरल्या, तर इतर वाहनांचाही अपघात झाला. या घटनांमुळे काही काळ परिसरात वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला होता. या घटनांची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी पाण्याचा मारा करून रस्त्यावरील चिखल साफ केला. रस्ता धुऊन स्वच्छ केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# बदलते हवामान आणि तंत्रज्ञान: एक आव्हान

जगातील तंत्रज्ञान ज्या वेगाने बदलते आहे, त्यापेक्षाही शंभरपट वेगाने हवामान बदलते आहे. तंत्रज्ञानाच्या आधारावर हवामानाचा अंदाज व्यक्त केला जातो. उपग्रहांची मदत घेऊन एकूण पृथ्वीवर होणाऱ्या बदलांचे भाकित वर्तवण्याचाही प्रयत्न होतो. परंतु गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञानाची मदत घेऊन संभाव्य संकटांची माहिती दिली जाते. त्याचवेळी व्यक्त केले जाणारे हवामानाविषयीचे अंदाज तंतोतंत खरे ठरतीलच असे काही सांगता येत नाही. अगदी यावर्षी नेहमीपेक्षा पाऊस कमी पडेल, असा अंदाज हवामान विभागाकडून वेधशाळांकडून किंवा हवामान तज्ज्ञांकडूनही व्यक्त झाला होता. नेहमीपेक्षा पाऊस थोडा उशिरा सुरू झाला. मात्र केवळ महिनाभरातच पावसाने सगळे अंदाज चुकीचे ठरवले. राज्यातील सगळी धरणं तर शंभर टक्के भरायला आली आहेतच. त्याशिवाय देशभरात जवळपास सगळ्याच राज्यांमध्ये भरपूर पाऊस झालेला आहे. काश्मीरमधली ढगफुटी, केरळमधली अतिवृष्टी, आसाममध्ये आलेला 'न भूतो न भविष्यती' असा महापूर, यामध्ये पावसाने केलेली कृपा जशी दिलासादायक ठरली. तशीच अतिवृष्टीचे संकट त्रासदायक ठरले. एकीकडे अधिक पाऊस किंवा अतिवृष्टीसारखी परिस्थिती असताना दुसरीकडे जगाच्या काही भागात उष्णतेची लाट निर्माण होताना दिसून येते. पॅसिफिक महासागरामध्ये निर्माण होत असलेली एल निनोची परिस्थिती भविष्यकाळात आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त झालेली आहे. जगातल्या अनेक हवामानाचा अभ्यास करणाऱ्या संस्था आणि हवामान तज्ज्ञांनी ही एल निनोमुळे निर्माण झालेली उष्णतेची लाट म्हणजे गेल्या दीडशे वर्षातल्या उष्णतेचा विक्रम मोडणारी असेल असे म्हटले आहे. एकूणच हवामानातला हा बदल उष्णता तर निर्माण करेलच. परंतु त्यासोबतच काही देशांमध्ये अतिवृष्टीसारखी संकटंदेखील निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जाते आहे. प्रामुख्याने एल निनो असेल किंवा पर्यावरणातून होणारे इतर बदल असतील. त्याचा अनपेक्षित असा विपरित परिणाम समोर येऊ लागला आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या बदलांची नोंद घेता येते. परंतु व्यक्त होणाऱ्या अंदाजांपेक्षा त्याचे स्वरूप खूप वेगवेगळे पाहायला मिळते.

### तंत्रज्ञानाच्या मर्यादा

एकूणच सध्याच्या परिस्थितीचा विचार केला तर वेगाने बदलणारे तंत्रज्ञान आणि त्याच्याही दुप्पट वेगाने बदलणारे हवामान या दोन्ही गोष्टी एक आव्हान म्हणूनच लक्षात घ्याव्या लागतात. तंत्रज्ञानाचे उपयोग मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र त्याबरोबर त्याचा दुरूपयोग करण्याचे कामही प्रचंड वेगाने वाढते आहे. प्रत्येकाच्या हातात असलेला मोबाईल हा जितका सोयीचा वाटतो तितकाच तो गैरसोयीचा होऊ लागला आहे. रोज हजारो प्रकारच्या रील्स तयार होतात. शेकडो ॲप्स निर्माण होतात. या सर्वांमधून प्रत्येक मोबाईलधारक हा आपला ग्राहक आहे असे ठरवून त्याचा मार्केटिंगसाठी उपयोग होतो. या बाजारू प्रकारामध्ये फसवणुकीच्या घटना वाढू लागलेल्या आहेत. सायबर गुन्हेगारांपासून ते डिजिटल व्यवहारात केली जाणारी फसवणूक देशभरात दरवर्षी काही हजार कोटींची लूट करते आहे. एवढेच नव्हे तर ज्या तंत्रज्ञानाचा उपयोग गुणवत्तावाढीसाठी व्हायला हवा. त्याबरोबरच गुणवत्तेला मारक ठरण्याचे प्रकारही होऊ लागले आहेत. मग नीट पेपरसारख्या पेपर फुटीच्या घटना असतील किंवा बनावट गुणपत्रिका तयार करण्यापर्यंत या तंत्रज्ञानाचा सर्रास वापर होतो आहे. सायबर गुन्हेगारीचा प्रभाव तर इतका वाढला आहे की, कुठल्या क्षणी कुठल्या पद्धतीने आपल्या खात्यातील पैशांचा पोबारा होईल हे सांगता येत नाही. देशाच्या किंवा जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात बसून केवळ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही सायबर दरोडेखोरी धुमाकूळ घालते आहे. सध्या देशात अनेकांना इन्कम टॅक्स विभागाच्या नावाने हप्ते वसुलीच्या बोगस नोटीसा पाठवल्या जात आहेत. हुबेहुब इन्कम टॅक्स विभागाच्या वेबसाईटप्रमाणे समांतर वेबसाईट तयार केली गेली आणि नोटीशीची भीती दाखवून पैसे वसूल करण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. याशिवाय डिजिटल अरेस्ट हाही प्रकार अनेक उपाययोजना होऊनही तसाच चालू आहे. म्हणजेच तंत्रज्ञानाचा अनेक गोष्टींसाठी उपयोग होत असताना गैरव्यवहार, गैरप्रकार करण्यासाठी हेच तंत्रज्ञान मोठ्या कौशल्याने वापरले जाते आहे. या संकटांवर मात करायची असेल तर त्यापेक्षाही अधिक प्रभावशाली तंत्रज्ञान वापरात आणावे लागेल.

### विक्रमी उष्णतेची शक्यता

ज्याला आपण सामाजिक पर्यावरण म्हणू शकतो. त्यामध्ये अर्थकारण किंवा वातावरणात घडून येणाऱ्या बदलाचा समावेश होतो. या सर्वांसाठी तंत्रज्ञानाची मदतच घ्यावी लागते. परंतु पर्यावरण किंवा हवामानाचा विचार केला तर निसर्गाच्या या लहरीपणापुढे तंत्रज्ञान पुरे पडू शकत नाही असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तींबाबत थोडीफार पूर्वकल्पना देण्याचे काम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होऊ शकते. परंतु नैसर्गिक आपत्तीतून सहीसलामत सुटण्याची कोणतीच खात्री देता येत नाही. भूकंप, चक्रीवादळ, अतिवृष्टी, वाढतं तापमान किंवा अचानक उद्भवणाऱ्या शीतलहरी याबद्दलची माहिती देण्याचे काम तंत्रज्ञान करू शकते. परंतु ही संकटं परतवून लावण्याची शक्यता तंत्रज्ञानात नाही, हे आताच्या एल निनो किंवा उष्णता लाटेने सिद्ध केलेले आहे. जर पुढच्या वर्षभरात दीडशे वर्षांचा विक्रम निर्माण होणार असेल तर त्याबाबतची उपाययोजना आतापासूनच करावी लागेल. अगदी प्राथमिक अंदाजाप्रमाणे विक्रमी उष्णतेची लाट येणार असली तरी याचा अर्थ नेहमीपेक्षा हे संकट अधिक प्रमाणात राहील. यात काही शंका राहत नाही. म्हणजेच तंत्रज्ञान ज्या वेगाने या संकटाची पूर्वसूचना देत आहे. त्याच्या कितीतरी अधिक पटीने अशा संकटाचा वेग वाढतो आहे. तंत्रज्ञान आणि हवामान यांचा एकत्रित विचार करताना दोघांमधूनही संकटांचे किंवा आव्हानांचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होते. भारतासारख्या समशितोष्ण हवामान असलेल्या देशावर त्याचे निश्चितच चित्रविचित्र परिणाम होऊ शकतात.

## सुविचार

विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११

मन साफ असणारे लोक नेहमीच फसतात.
कारण ते दुसऱ्यांनाही स्वतःसारखं समजतात.

## पंचांग

बुधवार, ५ ऑगस्ट २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
आषाढ कृष्ण सप्तमी
नक्षत्र : अश्विनी



रवी उदय- ०६-१८
रवी अस्त- १९-११

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

कालाष्टमी, संत नामदेव महाराज पुण्यतिथी


मुद्रक, प्रकाशक सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : रोहित रमाकांत पांडे • कार्यकारी संपादकः समीर करंबे (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८९०८११६४२३, ८९०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by Jayshree Ramakant Khadilkar-Pande On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - Rohit Ramakant Pande • Executive Editor - Sameer Karambe (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### मलाई चिकन




★साहित्य : चिकनः ५०० ग्रॅम (धुतलेले आणि लहान तुकडे केलेले), मॅरिनेशनसाठीः अर्धा कप दही, २ मोठे चमचे आलं-लसूण पेस्ट, चवीनुसार मीठ, अर्धा छोटा चमचा काळी मिरी पावडर, ग्रेव्हीसाठीः २ मोठे चमचे तेल किंवा बटर, २ मोठे कांदे (बारीक चिरलेले), १०-१२ काजू (भिजवलेले), ३-४ हिरव्या मिरच्या, ४-५ हिरव्या वेलदोडा, १ इंच दालचिनी, १ मोठा चमचा कसुरी मेथी, अर्धा कप ताजी मलाई किंवा फ्रेश क्रीम, गरम मसाला.

★कृती : एका भांड्यात चिकनचे तुकडे घ्या. त्यात दही, आलं-लसूण पेस्ट, काळी मिरी पावडर आणि मीठ घालून चांगले मिक्स करा. हे मिश्रण अर्धा ते एक तास मुरण्यासाठी ठेवा.

एका पॅनमध्ये थोडे तेल गरम करून कांदा आणि काजू हलके मऊ होईपर्यंत परतून घ्या. थंड झाल्यावर मिक्सरमध्ये बारीक वाटा (पेस्ट बनवा).

एका कढईत तेल किंवा बटर गरम करा. त्यात खडे मसाले (वेलदोडा, दालचिनी) टाका. नंतर कांदा-काजूची तयार केलेली पेस्ट घालून तेल सुटेपर्यंत परता.

यात मॅरिनेट केलेले चिकन घाला आणि चांगले ढवळा. झाकण ठेवून मंद आचेवर चिकन १५-२० मिनिटे शिजू द्या. शेवटची पायरीः चिकन मऊ झाल्यावर त्यात ताजी मलाई (साय) आणि कसूरी मेथी हातावर चोळून टाका. ५ मिनिटे मंद आचेवर उकळी येऊ द्या. गरमागरम मलाई चिकन नान किंवा चपातीसोबत खाण्यासाठी तयार आहे.




# महिला टी-२० आशिया कप युएईमध्ये होणार?

## एसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वींकडे प्रस्ताव

**महिला टी-२० आशिया कप २०२६ स्पर्धा २८ ऑगस्ट ते १३ सप्टेंबरदरम्यान संयुक्त अरब अमिरातीत खेळवली जाण्याची दाट शक्यता आहे. मात्र आशियाई क्रिकेट परिषदेने अद्याप या स्पर्धेचे ठिकाण आणि अधिकृत वेळापत्रक जाहीर केलेले नाही. आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीबी) अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे.**




■ दुबई

**या सहाव्या** टी-२० आशिया कपमध्ये एकूण ८ संघ आमनेसामने असतील. यात विद्यमान विजेता श्रीलंका, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, मलेशिया, थायलंड आणि युएई या संघांचा समावेश आहे. आशियाई क्रिकेट परिषदेकडून अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने स्पर्धेसाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली १५ सदस्यीय भारतीय महिला संघाची घोषणा केली होती. परंतु एसीसीकडून अंतिम मंजुरी आणि अधिकृत घोषणा बाकी असल्याने ती पोस्ट मागे घेण्यात आली. आशिया कप संपल्यानंतर अवघ्या ४ दिवसांत म्हणजेच १७ ते २४ सप्टेंबर दरम्यान जपानमधील नागोया येथे आशियाई क्रीडा स्पर्धेमधील महिला क्रिकेटचे सामने सुरू होणार आहेत. त्यामुळे आशियाई संघांचे वेळापत्रक अत्यंत व्यस्त असणार आहे.

आशियाई क्रिकेट परिषदेने २२ जुलै रोजी सर्व सहभागी देशांना स्पर्धेचा लोगो ईमेलद्वारे पाठवला होता.

महिला आशिया चषकाची सुरुवात २००४ मध्ये श्रीलंका येथे झाली. सुरुवातीच्या पहिल्या ४ आवृत्त्या (२००४, २००५-०६, २००६, २००८) या एकदिवसीय स्वरूपात खेळवल्या गेल्या होत्या. महिला क्रिकेटचा प्रसार आणि लोकप्रियता वाढवण्यासाठी २०१२ च्या आवृत्तीपासून ही स्पर्धा टी-२० क्रिकेट स्वरूपात खेळवण्यास सुरुवात झाली. स्पर्धेच्या इतिहासात भारतीय संघ सर्वात यशस्वी ठरला आहे. भारताने आजवर झालेल्या सर्वच्या सर्व अंतिम सामने गाठल्या आहेत. भारताने २००४ ते २०१६ पर्यंत सलग ६ वेळा विजेतेपद पटकावण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला. २०१८ मध्ये बांगलादेशने अंतिम सामन्यात भारताचा पराभव करून पहिल्यांदा विजेतेपद मिळवले आणि भारताचे सलग विजयाचे रथ रोखला.

२०२२ मध्ये भारतीय महिलांनी टी-२०चा आशिया कप जिंकला होता. २०२४ च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेने बलाढ्य भारतीय संघाला ८ गडी राखून पराभूत करत आपले पहिलेवहिले आशिया चषक विजेतेपद पटकावले.भारताची माजी कर्णधार मिताली राज ही आशिया चषकाच्या इतिहासात सर्वाधिक धावा (१,१२७ धावा) करणारी खेळाडू आहे.



# फिलिपिन्सच्या ईलाने पहिले डब्ल्यूटीए विजेतेपद जिंकले

■ वॉशिंग्टन

**फिलिपिन्सची** २१ वर्षांची टेनिस स्टार ॲलेक्स ईलाने वॉशिंग्टनमध्ये झालेल्या म्युबाडाला डीसी ओपनमध्ये इतिहास रचला. तिने अंतिम सामन्यात अव्वल मानांकित आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची खेळाडू जेसिका पेगुलाला ४-६, ६-४, ६-० अशा फरकाने पराभूत करून आपल्या कारकिर्दीतील पहिले डब्ल्यूटीए ५०० विजेतेपद पटकावले.

डब्ल्यूटीए टूर-लेव्हल एकेरीचे विजेतेपद जिंकणारी ॲलेक्स ईला ही फिलिपिन्सची पहिलीच टेनिस खेळाडू ठरली. रविवारी मुसळधार पावसामुळे सामना थांबवावा लागला होता. त्यावेळी पेगुलाने पहिला सेट ६-४ ने जिंकला होता आणि दुसऱ्या सेटमध्ये ईला २-१ ने पुढे होती. सोमवारी खेळ पुन्हा सुरू झाल्यावर ईलाने जबरदस्त पुनरागमन केले. दुसऱ्या सेटमध्ये ४-३ ने मागे असताना ईलाने सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले आणि हा सेट ६-४ ने जिंकला. सलग शेवटचे ८ गेम्स जिंकून तिसऱ्या सेटमध्ये पेगुलाला ६-० असा 'बॅगेल' (एकही गेम न देऊ देणे) दिला. ईलाने या स्पर्धेत विजेतेपद मिळवण्यासाठी स्पर्धेतील अव्वल ३ मानांकित खेळाडूंना पराभूत केले, ज्यात नाओमी ओसाका, एलिना स्वितोलीना आणि जेसिका पेगुला यांचा समावेश आहे.

# आयर्लंड व अफगाणिस्तानात आजपासून वनडे मालिका सुरू

**डब्लिन** - आयर्लंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील ५ सामन्यांची एकदिवसीय मालिका आजपासून ब्रेडी, उत्तर आयर्लंड येथे सुरू होणार आहे. या मालिकेत दोन्ही संघ नवीन कर्णधार उतरणार आहेत. या मालिकेतील पहिला आणि दुसरा सामना अनुक्रमे ५ आणि ७ ऑगस्टला ब्रेडी क्रिकेट क्लबमध्ये, पुढील तीन सामने १०, १२ आणि १५ ऑगस्टला सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट क्लबमध्ये होणार आहेत. कर्णधार पावेल स्टर्लिंगचे संघात पुनरागमन झाले असून, मुख्य प्रशिक्षकपदी गॅरी विल्सन आहेत. रहमत शाह पहिल्यांदाच एकदिवसीय संघात कर्णधाराची धुरा सांभाळणार आहे.

# टांझानियामध्ये पहिल्या क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन

■ डोडोमा

**आंतरराष्ट्रीय** क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शहा यांनी टांझानियामधील पहिल्या आयसीसी मान्यताप्राप्त 'टांझानिया क्रिकेट एरिना' स्टेडियमचे उद्घाटन केले. दार एस सलाम विद्यापीठाच्या आवारात उभारण्यात आलेले हे स्टेडियम टांझानिया आणि संपूर्ण आफ्रिका खंडातील क्रिकेटच्या विकासासाठी एक ऐतिहासिक टप्पा मानले जात आहे.

या महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल क्रिकेट टांझानियाचे अभिनंदन करताना जय शहा यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाला की, टांझानिया क्रिकेट एरिनाचे उद्घाटन हा टांझानिया आणि संपूर्ण आफ्रिकेतील क्रिकेटसाठी एक मैलाचा दगड आहे. देशातील पहिल्या आयसीसी मान्यताप्राप्त क्रिकेट स्टेडियमचे अधिकृत उद्घाटन करणे हा माझ्यासाठी एक मोठा सन्मान आहे.

हे स्टेडियम टांझानियामध्ये क्रिकेट खेळाचा विस्तार करण्यासाठी आणि त्याला चालना देण्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाची दृष्टी, समर्पण आणि कठोर परिश्रम यांचे जिवंत उदाहरण आहे.

## जाहीर सूचना

सदर सूचनेद्वारे आम्ही जनतेचे लक्ष वेधून घेत आहोत की, माझे अशील अदनान अमनुल्ला खान, वय ३४ वर्षे यांनी मायफेअर सोनाटा ग्रीन सीटीएस २ए/२, गोदरेज-हिरानंदानी लिंक रोड, ऑफ एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०७९ येथे वसलेल्या आणि स्थित बाराव्या मजल्यावरील सदनिका क्र. ए/१२०१ आणि ए/१२०२, मोजमाप अदमासे ४५६ चौ. फू. (कार्पेट क्षेत्रफळ) (यापश्चात "सदर जागा" असे उल्लेखित) व त्यासह कंपाऊंडमधील पोडीयमवरील एक कार पार्किंग जागा क्र. ६२ बिल्डरच्या करारपत्र बीडीआर-१४-०२०२४ ०२०२३-२००८ नुसार श्री. अमीत व्ही. शिंदे आणि सौ. सोनल ए. शिंदे यांच्याकडून खरेदीकरिता टोकन रक्कम प्रदान केली होती. आम्ही वित्तीय किंवा भौतिक दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कागदोपत्री पुराव्यासह आमंत्रित करीत आहोत आणि तसेच कोणतीही इतर बँक किंवा वित्तीय संस्थेचा सदर संबंधित सदनिका जागेवर कर्ज किंवा गहाणखत असल्यास त्यांनी सदर प्रसिद्धीच्या दिवसापासून १४ दिवसांमध्ये कोणत्याही कारणाने कायदेशीर दावा किंवा शीर्षक हक्काकरिता आमच्या ॲडव्होकेटकडे किंवा मालमत्तेच्या मालकांना भेटावे, अन्यथा आम्ही विक्री करारपत्राच्या नोंदणीसह मालकीहक्काच्या औपचारिकता पूर्ण करू.
ठिकाणः मुंबई
दिनांकः ५ ऑगस्ट, २०२६

सही/-
ॲड. अशोक व्ही. तिवारी
डी-३२१, सागर पार्क, अमृत नगर,
घाटकोपर (प), मुंबई - ४०००८६.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given by my clients, **1) Mr. Ashokkumar Hareshwar Manjrekar, 2) Mr. Yatin Ashokkumar Manjrekar and 3) Miss Shweta Ashokkumar Manjrekar,** that **Mrs. Kanchan Ashokkumar Manjrekar,** who expired on 14-06-2026 was the registered member and shareholder of the Vidya Yashomandir Co-operative Housing Society Limited (now amalgamated into Godavari Pravara Co-operative Housing Society Limited) (**"the Society"**) a co-operative housing society registered under the provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, vide Registration No. BOM/HSG/3728 of 1972. After the death of Mrs. Kanchan Ashokkumar Manjrekar, my clients **1) Mr. Ashokkumar Hareshwar Manjrekar** (husband of the deceased), **2) Mr. Yatin Ashokkumar Manjrekar** (son of the deceased) and **3) Miss Shweta Ashokkumar Manjrekar** (daughter of the deceased), are the only legal heirs of late Mrs. Kanchan Ashokkumar Manjrekar. The Society has issued 10 fully paid-up Shares of the Society, bearing Distinctive nos. 421 to 430 (both inclusive), represented by Share Certificate no.43, dated 6th December 2025 in favour of my Clients and they are absolutely and exclusively entitled to hold, possess and enjoy the new residential flat more particularly described in Schedule written hereunder (**"New Premises"**) allocated in pursuance of old premises and membership under Development Agreement dated 21st October 2021. My clients have approached Runwal Developers Limited for execution and registration of Permanent Alternate Accommodation Agreement and handing possession of the New Premises alongwith car parking to them in equal share.

All persons/party/parties having any claim, right, title, interest, share, demand objection against or in to or upon the said New Premises and Shares in the Society including or any part thereof by way of inheritance, will, succession, bequest, mortgage, possession, sale, transfer, gift, exchange, lease, lien, charge, tenancy, trust, licence, maintenance, easement or otherwise howsoever through any agreement, writing, succession, family arrangement/ settlement, litigation, decree or court order or otherwise of any nature whatsoever by operation of law as appliable or otherwise howsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned alongwith the requisite documentary proof in support of such claim, at the address given below within fourteen (14) days from the date hereof. If no such claim is made known within the said notice period, Runwal Developers Limited will execute Permanent Alternate Accommodation Agreement in respect of the said New Premises in favour of **1) Mr. Ashokkumar Hareshwar Manjrekar, 2) Mr. Yatin Ashokkumar Manjrekar** and **3) Miss Shweta Ashokkumar Manjrekar** and handing over possession to them. Any claim or claims which are made after the said notice period will be considered as waived or abandoned for all intents and purposes and shall not be binding on my clients.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**
**(New Premises)**

Flat No. 502, having area admeasuring about 792 sq. ft. Rera Carpet area, located on the 5th floor in Tower no. A along with one car parking space, in the project known as "Codename Rare by Runwal", constructed on plot of land bearing CTS No. 195(part), near Y.M.C.A, Andheri (West), Mumbai – 400053 and Shares of the Society, bearing Distinctive nos. 421 to 430 (both inclusive), represented by Share Certificate no.43, dated, 6-12-2025.

**Dated this 05th day of August, 2026.**

Sd/-.
**Adv. Prashant M. Deshmukh**
Office at C-26, B-101, Gokuldham, Goregaon (East), Mumbai 400 063.

## अर्ज क्र. आयएनसी-२६

**[कंपन्यांचे (स्थापना) नियमन २०१४ च्या नियमन ३० नुसार]**
कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये बदलण्याकरिता
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाची जाहिरात
केंद्र शासन, पश्चिम विभाग, मुंबई यांच्या समक्ष
कंपनी कायदा, २०१३च्या कलम १३ च्या उप कलम ४ आणि कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३० च्या उप-कलम (५) च्या खंड (अ) च्या प्रकरणात
आणि
**पॅसिफिक हॅबिटेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**
सीआयएनः U70100MH2014PTC259774
नोंदणीकृत कार्यालयः ३०२, ३ रा मजला, सिल्व्हर पर्ल, पंचशील प्लॉट क्र. २१३, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५० यांच्या प्रकरणात ... याचिकाकर्ता

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय "मुंबई" येथून "एनसीटी दिल्ली" येथे बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता बुधवार, दि. १ जुलै, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पारित करण्यात आलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीच्या मेमोरॅण्डमच्या बदलास मंजुरी मिळविण्यासाठी, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये केंद्र शासन यांच्याकडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे. कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी एकतर एमसीए पोर्टल (www.mca.gov.in) येथे गुंतवणुकदार तक्रार अर्ज भरून किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेले प्रतिज्ञापत्र विभागीय संचालक यांना पत्ता - एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरिन ड्राईव्ह, मुंबई-४००००२, महाराष्ट्र येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत स्वतः किंवा अन्य कोणाही तर्फे पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत अर्जदार कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयास खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर पाठवावीः नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ताः ३०२, ३ रा मजला, सिल्व्हर पर्ल, पंचशील प्लॉट क्र. २१३, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५०

अर्जदार पॅसिफिक हॅबिटेट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड करिता आणि त्यांच्या वतीने.

**मोहम्मद सैफ मलिक (संचालक)**
**दिनांकः ०५.०८.२०२६** **डीआयएनः ०१३८७८६८**

## जाहीर नोटीस

प्रबंधक/तनिस/मु.उप./सुनावणी/२०१६ अपिल क्र १५६/२०२६
जा. क्र. ९०५
श्री प्रवीण राजाराम पालांडे
विरुध्द
अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का) तथा अपिलिय प्राधिकारी, पश्चिम उपनगरे, आणि इतर

अपिलार्थी श्री प्रवीण राजाराम पालांडे, यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलिय प्राधिकारी (अति./निष्का) पूर्व उपनगरे यांच्या आदेशाविरुध्य महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) १९७१ अधिनियम कलम ३५ अंतर्गत नियम ७ (२ (अ)) अन्वये तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) आमचे कार्यालयात अपिल क्र १५६/२०२६ दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे न्यायालयासमोर दिनांक १६/०७/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी प्रतिवादी यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रतिवादी क्र ३ सचिव/अध्यक्ष, मुलुंड विजय नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, प्रतिवादी क्र ४ विकासक, ओम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, प्रतिवादी क्र ५ श्री गजानन शंकर साळवी, प्रतिवादी क्र ६ मोहम्मद मोईन खान, व प्रतिवादी क्र ७ ज्युली जोसेफ पनीकल, यांचा जो पत्ता दिला आहे त्या पत्यावर नोटीस प्रतिवादी यांना बजावली होती. परंतु सदर प्रकरणी ते गैरहजर होते.

सदर अपिल प्रकरणी अपिलार्थी यांनी मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे दालनात दाखल केलेल्या अपिलात प्रतिवादी क्र ३ सचिव/अध्यक्ष, मुलुंड विजय नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, प्रतिवादी क्र ४ विकासक, ओम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, प्रतिवादी क्र . ५ श्री गजानन शंकर साळवी, प्रतिवादी क्र ६ मोहम्मद मोईन खान व प्रतिवादी क्र ७ ज्युली जोसेफ पनीकल, यांचे म्हणणे ऐकण्यासाठी म्हणून दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे), पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. सदर प्रकरणी प्रतिवादी क्र ३ सचिव/अध्यक्ष, मुलुंड विजय नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, प्रतिवादी क्र ४ विकासक, ओम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, प्रतिवादी क्र ५ श्री गजानन शंकर साळवी, प्रतिवादी क्र ६ मोहम्मद मोईन खान, व प्रतिवादी क्र ७ ज्युली जोसेफ पनीकल, यांचे यांनी आपलेकडील मूळ कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर सुनावणीस आपण उपस्थित न राहिल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

सही/-
(नंदकुमार आर. साळवी)
प्रबंधक
तक्रार निवारण समिती
(मुंबई उपनगरे)

स्थळ : मुंबई शहर
दिनांक : २८/०७/२०२६

# मुंबईतील सरकारी कार्यालयांची वीजबिले एकत्रित भरणार

■ मुंबई

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील राज्य सरकारच्या सर्व शासकीय कार्यालयांची वीजबिले आता बेस्ट उपक्रमाच्या संयुक्त बिलिंग प्रणालीद्वारे एकत्रित पद्धतीने भरली जाणार आहेत. या प्रशासकीय सुधारणेला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार, सर्व शासकीय वीज जोडण्यांची माहिती एका प्रणालीवर आणली जाणार आहे. सर्व विभागांना ३० दिवसांच्या आत संयुक्त बिलिंग पोर्टलवर नोंदणी करून आपल्या वीज जोडण्यांची माहिती तपासावी लागणार आहे. तसेच १ एप्रिल २०२६ पासून सर्व शासकीय वीज जोडण्या प्रीपेड पद्धतीत रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला. संयुक्त बिलिंग प्रणालीमुळे विविध कार्यालयांची वीजबिले एकाच ठिकाणाहून भरता येणार आहेत. त्यामुळे बिल भरण्यास होणारा विलंब, त्यावर लागणारे दंड आणि व्याज टाळता येणार आहे. ऑटो-डेबिट सुविधेमुळे वीजबिले वेळेत भरणेही शक्य होणार आहे. सध्या बिलांच्या विलंबामुळे १२ ते १५ टक्क्यांपर्यंत अतिरिक्त व्याजाचा आर्थिक भार येतो. हा खर्च टाळण्यास या व्यवस्थेची मदत होणार आहे. सध्या बेस्टच्या प्राधिकृत कोड प्रणालीअंतर्गत ३२२ गटांतील १० हजार १७ ग्राहक, तर राज्य शासनाचे १०४ गटांतील ८६९ ग्राहक आहेत.

# राज्य माहिती आयोगात ३ नवी आयुक्त पदे मंजूर

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत राज्य माहिती आयोगातील माहिती आयुक्तांची ३ नवीन पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच या आयुक्तांसाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचारी पदेही निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

माहिती अधिकार कायद्यानुसार नागरिकांना सरकारी कामकाजाशी संबंधित माहिती मिळवून देण्याची महत्त्वाची जबाबदारी राज्य माहिती आयोगावर आहे. माहिती मागणीच्या प्रकरणांमध्ये संबंधित विभागाकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यास नागरिक आयोगाकडे अपील करू शकतात. अशा प्रकरणांची संख्या वाढत असल्याने आयोगावरील कामाचा ताणही वाढला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य माहिती आयोगातील राज्य माहिती आयुक्तांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला. नव्या ३ पदांमुळे प्रलंबित अपील आणि तक्रारींच्या सुनावणीला गती मिळण्याची शक्यता आहे.

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

पान १ वरून

२२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप गावात साध्या शेतकरी कुटुंबात झाला. १९८३ मध्ये नवी मुंबई येथे त्यांनी रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना केली. पुढे डी. वाय. पाटील समूहाच्या माध्यमातून अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, कृषी, हॉटेल मॅनेजमेंट यांसह विविध क्षेत्रांतील शिक्षण संस्थांचे मोठे जाळे उभारले. आजवर लाखो विद्यार्थ्यांनी या संस्थांमधून शिक्षण घेतले आहे. त्यांनी आरोग्य क्षेत्रातही योगदान देत नवी मुंबई, पुणे आणि कोल्हापूर येथे त्यांच्या संस्थांच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी रुग्णालये सुरू केली. क्रीडा क्षेत्रात त्यांनी नेरुळ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे डी. वाय. पाटील क्रिकेट स्टेडियम उभारले.

डॉ. पाटील यांनी राजकीय जीवनाची सुरुवात काँग्रेसमधून केली. १९५७ ते १९६२ या काळात त्यांनी नगरसेवक म्हणून कोल्हापूर नगरपालिकेत काम केले. त्यानंतर १९६७ आणि १९७२ मध्ये पन्हाळा विधानसभा मतदारसंघातून ते आमदार म्हणून निवडून आले. दीर्घ सार्वजनिक आणि राजकीय कारकिर्दीनंतर त्यांची २००९ मध्ये त्रिपुराच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी बिहारचे राज्यपाल म्हणूनही जबाबदारी सांभाळली. काही काळ त्यांनी पश्चिम बंगालच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही पाहिला होता. सर्वपक्षीय नेत्यांशी चांगले संबंध असलेले आणि मनमिळावू स्वभावाचे नेते म्हणून त्यांची ओळख होती. १९९४ ते १९९७ या काळात त्यांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. या काळात देशातील तांत्रिक शिक्षणाच्या विकासासाठी त्यांनी काम केले. शिक्षण आणि समाजसेवेतील योगदानाची दखल घेत भारत सरकारने १९९१ मध्ये त्यांना ‘पद्मश्री’ पुरस्काराने सन्मानित केले. याशिवाय विविध देशांतील विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट प्रदान केली. शिवाजी विद्यापीठाने २०१५ मध्ये त्यांना ‘डी.लिट.’ पदवी देऊन गौरव केला. २०१८ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र वयामुळे ते सक्रिय राजकारणापासून अलिप्त होते.

त्यांच्या निधनावर राज्यातील नेत्यांसह विविध क्षेत्रांतील लोकांनी शोक व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहताना एक्सवर लिहिले की, महापौर, लोकप्रतिनिधी ते राज्यपाल असा त्यांचा प्रवास राहिला. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या निधनाने दूरदर्शी व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

# केंद्र सरकारकडून गोव्याला कर वाटपात ३९८ कोटी

■ पणजी

**केंद्र** सरकारने ऑगस्ट २०२६ च्या कर वाटपांतर्गत गोव्याला ३९८ कोटी रुपयांचा आगाऊ निधी जारी केला. देशभरातील राज्यांसाठी मंजूर केलेल्या एकूण १,०९,०१९ कोटी रुपयांच्या विशेष हप्त्यांपैकी हा एक भाग आहे. हा निधी १० ऑगस्ट रोजी मिळणाऱ्या नियमित मासिक कर वाटपापेक्षा वेगळा आणि अतिरिक्त आहे. राज्य सरकारची आर्थिक स्थिती बळकट करणे आणि पायाभूत सुविधा प्रकल्प, विकासकामे तसेच भांडवली खर्चाला गती देणे हे या निधीचे मुख्य उद्दिष्ट आहे. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या वेळेवर मिळालेल्या निधीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील याखाली लिहिलेल्या पहिल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या, निवासी जागेच्या (“सदर जागा”) प्रस्तावित खरेदीकरिता **लीलाबेन वल्लभभाई दोंडा** (“मालक”) यांच्याशी बोलणी करीत आहेत.

मालकांनी आम्हाला सूचित केले आहे की, दुसऱ्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली, सदर जागेच्या संदर्भातील मूळ भाग प्रमाणपत्र आणि कर्ज स्टॉक बॉण्ड प्रमाणपत्र (“सदर प्रमाणपत्रे”) हरवली/गहाळ झाली आहेत आणि आजपर्यंत त्यांना सापडलेली नाहीत.

सदर जागा किंवा तिच्या भागाच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, हमी, भेट, न्यास, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, परवाना किंवा जुन्या वहिवाटीचा किंवा सर्वप्रथम खरेदीचा कोणताही हक्क किंवा कोणत्याही करारपत्र किंवा इतर व्यवस्थेअंतर्गत किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरणाद्वारे पारित हुकूम, आदेश किंवा निवाड्याअंतर्गत किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या आणि/किंवा सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतींचा ताबा असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत संबंधित सहाय्यक दस्तऐवजांच्या प्रतींसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांचे कार्यालय- नळवाला बिल्डींग, ४१, मिंट रोड, जीपीओसमोर, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे, असे न केल्यास, अशा सर्व किंवा कोणतेही कथित दावे/आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

**वरील उल्लेखित पहिली अनुसूची**
**(“सदर जागेचे” वर्णन)**

७ए/५५१, भाईदास मगनलाल पथ (पान गल्ली), ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई ४०० ०३६ येथे स्थित वसलेल्या आणि असलेल्या ‘सूर्य किरण’ या इमारतीच्या १ल्या मजल्यावरील सदनिका क्र. ११ मोजमाप ५८८ चौरस फूट, कार्पेट क्षेत्रफळ किंवा साधारण तेवढेच.

**वरील उल्लेखित दुसरी अनुसूची**
**(“सदर प्रमाणपत्रांचे” वर्णन)**

भाग प्रमाणपत्र क्र. १००१ अंतर्गत समाविष्ट डिस्टिंक्टिव्ह क्र. १ ते ११६ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ११६ समभाग; आणि प्रमाणपत्र क्र. १०१ अंतर्गत समाविष्ट दर्शनी मूल्य रु. १००/-चे १२० कर्ज स्टॉक बॉण्ड्स.

दिनांक ५ ऑगस्ट, २०२६

**अडवाणी, सचवानी आणि हीरा**
**ॲडव्होकेट्स**
नळवाला बिल्डींग, ४१, मिंट रोड, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई ४००००१.

## निविदा सूचना

**दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादित, मुंबई.**
(नोंदणी क्र.बी.ओ.एम./आर. एस. आर/ ३५४/३.६.१९६७)
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी क्र. ३५११४२४६/५२, २२६२९४८४
ईमेल ubicrsoc@gmail.com

या संस्थेला खाली उल्लेखित सुविधायुक्त शिर्डी व अलिबाग येथील विश्रामगृहासोबत (रिसॉर्ट/हॉटेल) प्रत्येकी २५० एसी रुमनाईट व मुंबई विश्रामगृहासोबत १०० एसी रुमनाईट एक वर्षासाठी भाडे तत्वावर करार करुन घेणे आहेत. तरी **बुधवार दिनांक १२-०८-२०२६** रोजी **संध्याकाळी ०४:३०** वाजेपर्यंत निविदा मागवीत आहे. तरी इच्छूक हॉटेल/रिसॉर्ट मालकांनी आपली निविदा (सेवाशुल्कासह) प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिलेल्या वेळेत पोहोचतील अशा प्रकारे पाठवणे. उशिरा आलेली कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच या निविदेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळ राखून ठेवत आहे.

**सर्वसाधारण अटी/शर्ती :**

१) खोलीची क्षमता चार व्यक्तींसाठी असावी.
२) विनाशुल्क चहा व नाश्त्याची सुविधा असावी. (मुंबई व्यतिरिक्त)
३) जेवणाच्या बिलावर सूट दिल्यास प्राधान्य. (मुंबई व्यतिरिक्त)
४) स्विमिंग पुल असल्यास प्राधान्य. (मुंबई व्यतिरिक्त)
५) पार्किंग सुविधा उपलब्ध असावी. (मुंबई व्यतिरिक्त)
६) २५ लोक समाविष्ट होतील असा कॉन्फरेंस हॉल असावा. (मुंबई व्यतिरिक्त)
७) इतर काही बाबी असल्यास त्याची चर्चा करारपत्र करताना करण्यात येईल.

**दिनांक : ०५-०८-२०२६**
**ठिकाण : मुंबई**

शिक्का

**सही/-**
**(श्री. सचिन अ. नरहरी)**
**मानद सचिव**

## फॉर्म बी
## जाहीर उद्‌घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**सॅफायर लँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | सॅफायर लँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १९.१०.१९८९ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई। |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U45200MH1989PTC053963 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता (जर असल्यास) | खोली क्र. ०५,कॅप्रि, ३रा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५१. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | दि. ३० जुलै, २०२६ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | दि. ३१ जुलै, २०२६ |
| ८ | परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | नावः श्री. मनिष शाह<br>आयबीबीआय नोंदणी क्र.:<br>IBBI/IPA-001/IP-P00094/2017-18/10194 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः ए/५०२, कृष्णा पॅलेस, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, ४००१०१.<br>ईमेल आयडीः mdshah0211@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः ए/५०२, कृष्णा पॅलेस, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, ४००१०१.<br>ईमेल आयडीः sldpl.liq@gmail.com |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-V यांनी दि. ३१ जुलै, २०२६ रोजी सॅफायर लँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

सही/-
**मनिष शाह**

दिनांकः ०५.०८.२०२६
ठिकाणः मुंबई

**सॅफायर लँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणामध्ये परिसमापक**
**नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P00094/2017-18/10194**
**अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता (“एएफए”): AA1/10194/02/300627/109430**
**एएफए वैधता : ३०.०६.२०२७**

# बारच्या परवान्यावरून हायकोर्टाने एफडीएला पुन्हा फटकारले

■ मुंबई

**नवी मुंबईतील** एका बार अँड रेस्टॉरंटच्या परवान्यावरील स्थगिती वेळीच न उठवल्याबद्दल उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासनाला (एफडीए) पुन्हा एकदा फटकारले. संबंधित बार मालकाला झालेल्या नुकसानाबद्दल तुम्हाला दंड ठोठावण्याचा विचार करू, असा तोंडी इशाराही न्यायालयाने दिला. गेल्या आठवड्यात मंत्रालय तसेच अन्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील कँटीनवर कारवाई न केल्यावरून उच्च न्यायालयाला फटकारले होते. एफडीएचे वागणे पक्षपाती आहे, असे न्यायालयाने सुनावले होते. नवी मुंबईच्या बेलापूर येथील हॉटेल पवन बार अँड रेस्टॉरंटच्या मालकाने केलेल्या याचिकेवरील सुनावणीप्रसंगी एफडीएला पुन्हा एकदा न्यायालयाच्या रोषाला सामोरे जावे लागले. हॉटेल पवनवर एफडीएने २९ जून रोजी धाड टाकून तपासणी केली होती. त्यावेळी या हॉटेलमध्ये एफडीएच्या नियमांचे ६३ टक्के पालन होत असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी एफडीएने हॉटेल पवनचा परवाना निलंबित केला. परवाना निलंबनाला आव्हान देत हॉटेल पवनच्या मालकांनी एफडीएकडे तक्रार करून हॉटेलची पुन्हा तपासणी करण्याची मागणी केली.

ती मान्य करत एफडीएने १४ जुलै रोजी हॉटेलची पुन्हा तपासणी केली. या फेरतपासणी हॉटेल एफडीएच्या नियमांचे शंभर टक्के पालन करत असल्याचे आढळून आले. त्यानंतर एफडीएने हॉटेल पवनच्या परवान्याचे निलंबन मागे घेणे अपेक्षित होते. मात्र एफडीएने तसे केले नाही.

## न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
**गृह विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
विद्यानगरी, हंसभुग्रा मार्ग, सांताक्रूझ (पुर्व)- ९८
दूरध्वनी क्र. ०२२-२६६७०७५५/५८/

**ई - निविदा सुचना**

उत्पादक तसेच अधिकृत/मान्यता प्राप्त पुरवठादार यांना सूचीत करण्यात येते की, खालील बाबीच्या खरेदीसाठी ई-निविदा संचालनालयाकडून मागविण्यात येत आहेत.

| Sr.No. | Department Bid No. | Name of Kit |
|---|---|---|
| 1 | DFSL/MUM/DNAKit/POP-4/01/2026-27 | DNA Kit for POP-4(Polymer - 3.5ml) |

१. सदर इच्छुक निविदाधारकांना निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी **gem.gov.in** या संकेत स्थळाचा वापर दि.०५/०८/२०२६सकाळी १०.०० ते दि.१८/०८/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत करता येईल.
२. निविदेच्या अटी व शर्ती **gem.gov.in** या संकेत स्थळावर पहावयास मिळतील.

सही/-
संचालक,
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई.

क्रमांकः आरओसी- २०२६-२७/क्र. ५/सी २०८३

## बृहन्मुंबई महानगरपालिका
**खाते - जल अभियंता विभाग**
**क्र. कार्य.अभि. (परि.)ज.मा.का./२२५१/दि. ०४-०८-२०२६.**
**ई-निविदा सुचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषयांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर आणि महाटेंडर्स संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in निविदा अवलोकन अंतर्गत प्रसिद्ध/अपलोड करण्यात आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १. | २०२६_एमसीजीएम_१३२४३०८_१ | सहा.अभि.(परि.) ज.का.श.-१ विभागांतर्गत आपत्कालीन ट्रेलरवर बसविलेल्या जनरेटरसह हायड्रॉलिक HIGH MAST दिवा प्रणालीचा पुरवठा (निविदा दि. ०५.०८.२०२६) |

इच्छुक निविदाकारांनी तपशीलवार माहितीकरिता महाटेंडर्स संकेत स्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर भेट द्यावी.

सही /-
**कार्य.अभि. (परि.) ज.मा.का.**

पीआरओ/१००४/जाहि./२०२६-२७

**शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.**

## महाराष्ट्र शासन
**समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
३ चर्च पथ, पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१३७१८६, २६१२७५६९ ईमेल- swcedn.nationalscholar@gmail.com

**देशातील नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०२६-२७**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती/ नवबौध्द विद्यार्थ्यांकडून राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| विद्यार्थ्यांसाठी अटी व शर्ती | लाभाचे स्वरुप |
|---|---|
| • महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील असावा.<br>• महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>• कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाखापेक्षा कमी असावे.<br>• पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची कमाल वयोमर्यादा २५ वर्षे व पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्ष इतकी असेल.<br>• अभ्याक्रमाच्या प्रथम वर्गाला शिकत असला पाहिजे. तथापी त्यापुढील वर्षाचे विद्यार्थी अर्ज करु शकतील परंतु त्यांचा विचार प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास करण्यात येईल.<br>• विद्यार्थी इ.१० व १२वी ची परिक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.<br>• पदवी अभ्यासक्रमासाठी इ. १२ वीच्या परिक्षेमध्ये किमान ५५% गुण मिळविणे आवश्यक राहिल व डायरेक्ट द्वितिय वर्षासाठी प्रवेशीत विद्यार्थ्यांना डिप्लोमामध्ये ५५% गुण आवश्यक.<br>• पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेमध्ये किमान ५५% गुण असावेत.<br>• निवड वर्षामध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्यात येईल. मात्र उर्वरित अटी व शर्ती या कायम राहतील.<br>• सदरहू शिष्यवृत्ती देश पातळीवरील मान्यताप्राप्त संस्थामधील अभ्यासक्रमासाठी लागू राहिल. संस्थांची यादी संकेतस्थळावरील सविस्तर जाहिराती मधील परिशिष्ठ ’ब’ नुसार पहावयास मिळेल<br>• वेळोवेळी या योजनेच्या अनुषंगाने निर्गमित झालेल्या इतर अटी व शर्ती विद्यार्थ्यांना बंधनकारक असतील.<br>• या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा अंतिम अधिकार शासनास राहिल.<br>• निवड झालेल्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. | • शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पुर्ण शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक शुल्क, डेव्हलपमेंट फी, इ. देण्यात येईल.<br>• शैक्षणिक संस्थेतील वसतिगृह व भोजन शुल्क याचा त्यांच्या आकारणीप्रमाणे खर्च देण्यात येईल.<br>• शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात जागेअभावी प्रवेश न मिळाल्यास सदर विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले वसतिगृह व भोजन शुल्क देण्यात येईल.<br>• वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येईल.<br>• प्रवेशीत अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी रु.५,०००/- व शैक्षणिक साहित्य आणि इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण रु.५,०००/- असे एकूण रु.१०,०००/- प्रत्येक वर्षी देण्यात येईल. |

वेबसाईट वरून अर्ज डाऊनलोड करून तो परिपुर्ण व आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ०४/०९/२०२६ पर्यंत सायं. ६.१५ वाजेपर्यंत पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे- ४११००१ येथे सादर करण्यात यावेत. अर्जाच्या लखोटयावर देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना अर्ज असा ठळक उल्लेख करण्यात यावा.

अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर जाऊन भेट द्यावी.

स्थळ :- पुणे
दिनांक :- ०५/०८/२०२६

सही/-
**(दिपा मुधोळ-मुंडे)**
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

क्रमांकः आरओसी- २०२६-२७/क्र-५/सी २०९४

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल, **मे. युनिक गिफ्ट्स**, ही एक भागीदारी संस्था, हिने तिचे भागीदार, म्हणजेच (१) श्री.सुशील प्रल्हादराय मुरारका, (२) श्रीमती रीटा सुशील मुरारका आणि (३) श्रीमती रेनिता मयंक कोठारी, जे मुंबई शहर नोंदणी जिल्ह्यात, माझगाव विभागाच्या कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ७१३ असलेल्या भूखंडावरील, दादोजी कोंडदेव क्रॉस मार्ग, भायखळा (पूर्व), मुंबई-४०० ०२७ येथे स्थित, ससेक्स इंडस्ट्रियल इस्टेट (ए बिल्डिंग) नावाने ज्ञात इमारतीच्या ५ व्या मजल्यावरील युनिट क्र.ए-५२० चे पूर्वीचे मालक आहेत, यांच्याकडून (१) श्री. मधुकांत द्वारकादास मेहता आणि (२) श्रीमती प्रमिला मधुकांत मेहता यांच्यात मुंबई येथे दिनांक १२ डिसेंबर, १९८९ रोजी झालेल्या सदर युनिटचे करारनाम्याची मूळ प्रत गमावली आहे किंवा गहाळ झाली आहे, ज्यांचा त्यात एका पक्षाचे हस्तांतरकर्ता म्हणून उल्लेख आहे, आणि श्री. शैलेश छोटालाल परमार, ज्यांचा त्यात दुसऱ्या पक्षाचे हस्तांतरिती म्हणून उल्लेख आहे.

त्या संदर्भात हरवल्याची/गहाळ झाल्याची तक्रार **भायखळा पोलीस स्टेशन**, मुंबई येथे **०४ ऑगस्ट, २०२६** रोजी ऑनलाईन नोंदवण्यात आली आहे, ज्याचा हरवल्याची तक्रार क्र.१०८२६१-२०२६ आहे.

जर ते सापडलेल्या कोणत्याही व्यक्तीला ते खाली नमूद केलेल्या पत्त्यावर माझ्याकडे सुपूर्द करण्याची विनंती करण्यात येत आहे आणि उपरोक्त दस्तऐवज, सदर युनिट किंवा त्याचा कोणताही भाग किंवा सदर सोसायटीच्या संबंधित शेअर्सविरुद्ध कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, या सूचनेच्या कागदोपत्री पुराव्यासह प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या कालावधीत, त्यास समर्थन देणाऱ्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर मला लेखी स्वरूपात कळवण्यास याद्वारे आवाहन करण्यात येत आहे, अन्यथा, कोणताही दावा आणि/किंवा आक्षेप असल्यास, तो सोडून दिला आहे आणि/किंवा त्यागला आहे असे मानले जाईल.

दिनांकः ०५.०८.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/-
**श्री. रोहित वसंत शिंदे**
वकील मुंबई उच्च न्यायालय,
द्वारा- मुकेश एच. जैन, कार्यालय क्र.११८ए, १ला मजला, नारायण उद्योग भवन, चिवडा गल्ली, लालबाग, मुंबई – ४०००१२

## TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Ref: EE/400KV/RS/O&M/DN/KLW/TECH/26-27/T-18/525** **Dt. 04.08.2026.**

MSETCL invites online bids (SRM-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | RFx No. | Description of Work | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **7000040552** | SRM E-Tender (3rd Call) for AMC for various maintenance activities to be carried out under planned and emergency outage through outsourced agency at 220KV Kalwa & 400KV Kalwa under 400KV R S O&M DN Kalwa for the F.Y.2026-27. | **Download and submission of tender Documents Date:**<br>Dt. 05.08.2026 11:00 Hrs to Dt. 15.08.2026 up to 10:00 Hrs<br>**Techno-commercial Opening: -** Dt.15.08.2026 at 11:00 Hrs (Onwards if possible)<br>**Price Bid Opening:-** Dt.15.08.2026 at 12:00 Hrs ( Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST 5%** |
| | | **Estimated Cost (Including GST)** | **Rs. 40,19,249/-** |

**Contact Person :** Executive Engineer/ Dy. Executive Engineer (O) & Mob No. 9920082425 / 7977325020.

1. Relevant portions of the Tender which the tenderers have to fill online would be available on aforesaid website.
2. Tender documents can be downloaded by online from aforesaid website.
3. Eligible contractor agencies should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400KV R S O&M DN KALWA**

## शीला फोम लिमिटेड

SheelaFoam INDIA · AUSTRALIA · EUROPE | 50 plus YEARS OF EXCELLENCE

नोंद. कार्यालयः १००२ ते १००६, दि ॲव्हेन्यू इंटरनॅशनल एअरपोर्ट रोड, हॉटेल लीला सहार समोर, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५९.
सीआयएनः L74899MH1971PLC427835
दूरध्वनीः ९१(०)-२२-२८२६५६८६/८८/८९,
ईमेलः contactus@sheelafoam.com, वेबसाईटः www.sheelafoam.com

**दि. ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अ-लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष**

शीला फोम लिमिटेड (“कंपनी”) च्या संचालक मंडळाने दि. ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ आणि ५२ नुसार, दि. ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अ-लेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष मंजूर केला आहे.

उपरोल्लेखित वित्तीय निष्कर्ष व त्यासह वैधानिक लेखापरिक्षकांचे मर्यादित पुनरावलोकन कंपनीची वेबसाईट https://www.sheelafoam.com/financial-reporting वर प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येतील.

**दिनांकः ०४ ऑगस्ट, २०२६**
**ठिकाणः नोएडा**

**शीला फोम लिमिटेड करिता**
**सही/-**
**(राहुल गौतम)**
**व्यवस्थापकीय संचालक**

# 'दिल ने ये कहा है दिल से'वर स्वीडिश कपलचा खास अंदाज

**बॉलिवूडच्या** गाण्यांची जादू सातासमुद्रापारही कायम आहे! याचीच प्रचिती देणारा एक भन्नाट व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. स्वीडिश कंटेंट क्रिएटर कार्ल स्वानबर्ग आणि त्याची पत्नी एकातेरिना यांनी 'धडकन' चित्रपटात अभिनेता सुनील शेट्टी, अक्षय कुमार आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांच्यावर चित्रीत केलेलं 'दिल ने ये कहा है दिल से' या लोकप्रिय गाण्याचे भन्नाट रिक्रिएशन केले. गाण्यातील रोमँटिक अंदाज, हावभाव आणि अभिनयाची नक्कल करत या कपलने नेटकऱ्यांची मनं जिंकली.

या कपलने गाण्यावर केवळ डान्स न करता त्यातील हावभाव, अभिनय आणि रोमँटिक अंदाजही साकारण्याचा प्रयत्न केला. बॉलिवूडच्या जुन्या गाण्याचा हा परदेशी अंदाज नेटकऱ्यांना चांगलाच भावला. कार्ल



आणि एकातेरिना यांनी हा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर शेअर करताना, या लोकप्रिय म्युझिक व्हिडिओची पुनर्निर्मिती करण्याचा पूर्ण प्रयत्न



केल्याचे म्हटले. तर या व्हिडिओवर अभिनेता सुनील शेट्टीनेही प्रतिक्रिया दिली. व्हिडिओ पाहिल्यानंतर सुनील शेट्टीने कमेंटमध्ये हार्ट इमोजी पोस्ट केला. त्याच्या या छोट्याशा प्रतिक्रियेमुळे स्वीडिश दाम्पत्याच्या रिक्रिएशनची चर्चा आणखी रंगली.

व्हिडिओवर नेटकऱ्यांनीही मजेशीर प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी या दाम्पत्याचे कौतुक केले, तर काहींनी त्यांच्या बॉलिवूड स्टाईलची गंमत घेतली. 'बॉलिवूड कधीच निराश करत नाही', अशा प्रतिक्रिया अनेकांनी दिल्या. काही यूजर्सनी तर या दाम्पत्याला थेट भारतीय रंगात रंगवण्याच्या मजेशीर कमेंट्सही केल्या.

# प्रियंका चोप्रा 'ममा' आणि 'ममासीता' लेकीला शिकवला दुर्गा सप्तशती मंत्र




**अभिनेत्री** प्रियंका चोप्राचा 'ममा' ते 'ममासीता' असा भन्नाट अंदाजातील व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यामध्ये एका बाजूला ती लेक मालती मेरीला मांडीवर घेऊन दुर्गा सप्तशतीचा मंत्र शिकवताना दिसते, तर दुसरीकडे मैत्रिणींसोबत बिनधास्त आणि ग्लॅमरस अंदाजात डान्स करताना दिसते. आईची माया आणि मैत्रिणींसोबतची धमाल अशा दोन्ही रूपांची झलक देणाऱ्या प्रियंकाच्या या व्हिडिओने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या व्हिडिओसोबत प्रियंकाने तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या दोन वेगवेगळ्या बाजू दाखवल्या आहेत. व्हिडिओच्या पहिल्या भागात ती मालतीसोबत निवांत वेळ घालवताना दिसते. त्यामध्ये ती मालती मेरीला मांडीवर घेऊन दुर्गा सप्तशतीचा मंत्र शिकवते. तर आईसोबत मालतीही मंत्र म्हणते. तर दुसऱ्या भागात ग्लॅमरस अंदाजात ड्रेस परिधान करून मैत्रिणींसोबत डान्स करताना तिचा बिनधास्त अंदाज पाहायला मिळतो. त्यामुळे एका बाजूला प्रेमळ आई आणि दुसऱ्या बाजूला मस्तीखोर मैत्रिण अशा प्रियंकाच्या दोन्ही बाजू या व्हिडिओत पाहायला मिळाल्या.

प्रियंका अभिनयासोबतच तिच्या कौटुंबिक आयुष्यामुळेही नेहमी चर्चेत असते. सोशल मीडियावर ती मुलगी मालती मेरी आणि पती निक जोनससोबतचे खास क्षण चाहत्यांसोबत शेअर करत असते. आता प्रियंकाने शेअर केलेल्या नव्या व्हिडिओमध्ये आई-मुलीचा गोड क्षण चाहत्यांना भावला आहे.

# ओरीची ७५ लाखांची बॅग रोहित शेट्टीही चकीत





**सोशल** मीडिया इन्फ्लुएंसर ओरी उर्फ ओरहान अवतरामानी सध्या 'खतरों के खिलाडी १५' मुळे चर्चेत आहे. मात्र यावेळी त्याच्या स्टंटपेक्षा त्याची महागडी बॅगच अधिक चर्चेचा विषय ठरत आहे. नुकत्याच प्रसारित झालेल्या भागात ओरी हर्मेस ब्रँडची बॅग घेऊन दिसला. या बॅगची किंमत तब्बल ७५ लाख रुपये असल्याचे त्याने सांगितले. ही रक्कम ऐकून शोचे होस्ट रोहित शेट्टीही आश्चर्यचकित झाले. त्यांनी गमतीत ओरीला, ही बॅग कुठून चोरली आहेस का? असा सवाल केला.

या बॅगची किंमत विचारल्यावर ओरीने सुरुवातीला २२ हजार रुपये सांगितली. मात्र नंतर त्याने खरी किंमत सांगितली. यावेळी सेटवर उपस्थित इतर स्पर्धकांनीही विनोदी प्रतिक्रिया दिल्या. अविनाश मिश्राने तर, शो जिंकूनही एवढी रक्कम मिळणार नाही, असे म्हणत वातावरण हलकेफुलके केले.

# डीपफेक तत्काळ थांबवा! मृणाल ठाकूरचा इशारा

**अभिनेत्री** मृणाल ठाकूर हिने एआयद्वारे तयार केला जाणाऱ्या डीपफेकविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. तिच्या ओळखीचा, चेहऱ्याचा किंवा प्रतिमेचा गैरवापर करणाऱ्यांना तिने थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. माझ्या चेहऱ्याचा वापर करून डीपफेक सामग्री तयार करणे किंवा शेअर करणे बेकायदेशीर आहे. हा तुमच्यासाठी अधिकृत इशारा समजून हे तत्काळ थांबवा, असे तिने म्हटले आहे.

सध्या अनेक भारतीय सेलिब्रिटींना डीपफेकचा उपद्रव सतावत आहे . अलीकडच्या काळात अक्षय कुमार, वरुण धवन, अनिल कपूर, शिल्पा शेट्टी, प्रीती झिंटा, कार्तिक आर्यन आणि सुनील शेट्टी यांसारख्या कलाकारांनी त्यांच्या ओळखीचा आणि प्रतिमेचा एआयद्वारे होणारा गैरवापर थांबवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. प्रीती झिंटाच्या प्रकरणात तिने बॉम्बे हायकोर्टात याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाने गुगल आणि मेटा यांना अशा सामग्री हटवण्याचा उपाय तयार करण्याचे निर्देश दिले. आता याबाबत मृणालनेही कठोर भूमिका घेतली आहे.



# भूमीचा जेन-झीला 'आदराचा' सल्ला

अभिनेत्री भूमी पेडणेकरने जेन-झीच्या नीट आंदोलनातील अपशब्दांवर नाराजी व्यक्त करत 'आदर आणि जबाबदारी'चा सल्ला दिला. मात्र, भूमीचा हा सल्ला तिच्याच जुन्या ॲक्टिंग टीचर श्रुती देसाईला खटकला आणि त्यांनी थेट अभिनेत्रीला आरसा दाखवला. तुम्ही तुमच्या शिक्षकांशी कशा प्रकारे वागायचा, हे मला अजूनही आठवतं, असे म्हणत श्रुती यांनी भूमीच्या जुन्या वर्तनाची आठवण करून दिली. त्यामुळे भूमीची पोस्ट आणि ॲक्टिंग टीचरचा पलटवार असा नवा ट्विस्ट सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. भूमीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला होता. यात आंदोलनादरम्यान पंतप्रधान मोदी यांच्याबद्दल वापरलेल्या अपशब्दांवर तिने नाराजी व्यक्त केली. तिने म्हटले होते की, देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीबद्दल आपल्या देशातील तरुणांनी अशा प्रकारची भाषा वापरणे योग्य नाही. आपल्या संस्कृती आणि मूल्यव्यवस्थेचा आपण आदर केला पाहिजे. देशाची प्रगती करायची असेल, तर चांगल्या आणि वाईट गोष्टींवर चर्चा करणे गरजेचे आहे.



# दिलीप कुमारांच्या निवासस्थानातील संग्रहालयाच्या जागेची विक्री होणार



**ज्येष्ठ** अभिनेत्री सायरा बानो यांनी त्यांचे दिवंगत पती आणि ज्येष्ठ अभिनेते दिलीप कुमार यांच्या वांद्रे येथील पाली हिल परिसरातील बंगल्याचा काही भाग विकण्याचा निर्णय घेतला आहे. या जागेवर दिलीप कुमार यांच्या स्मृती आणि कारकिर्दीला समर्पित संग्रहालय उभारण्यात येणार होते.

दिलीप कुमार यांचा बंगला पुनर्विकास केल्यानंतर 'द लिजेंड बाय आशर' या नावाची ११ मजली इमारत उभी राहणार आहे. या इमारतीच्या तळमजल्यावरील सुमारे १,६९६ चौरस फूट व्यावसायिक जागेची विक्री होणार आहे. या ठिकाणी दिलीप कुमार यांच्या स्मृती जतन करण्यासाठी संग्रहालय उभारण्याची घोषणा २०२३ मध्ये करण्यात आली होती. मात्र आता हीच जागा विकली जात असल्याने संग्रहालयाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुनर्विकास करण्यापूर्वी झालेल्या विकास करारानुसार, सायरा बानो यांच्या वैयक्तिक गरजा, देणी, कर आणि इतर खर्चांसाठी त्यांना ३५० कोटी रुपयांची परतफेड योग्य ठेव देण्यात येणार होती.



# एअर इंडियाचे विमान टर्ब्युलन्समध्ये सापडले! १२ प्रवासी जखमी

■ नवी दिल्ली

**फुकेतहून** दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या एआय २३७९ या विमानाला आज उड्डाणादरम्यान टर्ब्युलन्स म्हणजे तीव्र हवाई धक्के बसल्याने विमान आपल्या नियोजित मार्गापासून सुमारे ३०० फूट खाली आले. या घटनेत १२ प्रवासी जखमी झाले असून विमानाने दिल्ली विमानतळावर सुरक्षित लँडिंग केले.जखमी प्रवाशांना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच विमानातील दोन कर्मचारीदेखील (केबिन क्रू) जखमी झाले असून त्यापैकी एकाला गंभीर दुखापत झाल्याने रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेची चौकशी नागरी विमान उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) करत असून, तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडली का, याचाही तपास केला जात आहे. दरम्यान, एअर इंडियाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात या घटनेत कोणालाही गंभीर दुखापत झालेली नसल्याचे म्हटले आहे. आज फुकेत ते दिल्ली दरम्यानचे एआय २३७९ हे विमान नियमित उड्डाणात असताना अल्पकाळासाठी टर्ब्युलन्सचा सामना करावा लागला आणि त्यामुळे विमानाच्या उंचीत क्षणिक बदल झाला, असे कंपनीने स्पष्ट केले.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये विमानाच्या केबिनच्या छताच्या काही भागांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

# बाळूमामा मंदिर ट्रस्टच्या सीईओ नियुक्तीवर प्रश्नचिन्ह

■ बीड

**बाळूमामा** मंदिर ट्रस्टच्या सीईओ पदावरील नियुक्तीवरून नवे वाद निर्माण झाले आहेत. संजित कदम यांची नियुक्ती केवळ साध्या कागदावर आणि पेनाने लिहिलेल्या आदेशावर करण्यात आल्याचा दावा केला जात असून, त्यांच्या पात्रतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तत्कालीन धर्मादाय सहआयुक्त निवेदिता पवार यांनी संजित कदम यांची सीईओ म्हणून नियुक्ती केली. मात्र ही नियुक्ती कोणत्याही अधिकृत प्रक्रियेविना, साध्या अर्जावर आणि त्याच कागदावर लिहिलेल्या आदेशाद्वारे करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या ट्रस्टमध्ये इतक्या महत्त्वाच्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि अनुभव नसतानाही ही नियुक्ती झाल्याचा आरोप आहे. तक्रारदारांच्या मते, संजित कदम यांच्याकडे आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे नसूनही ते सध्या सीईओ पदावर कार्यरत आहेत. माहिती अधिकारातून या नियुक्तीबाबत माहिती मागवली असता संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचेही समोर आले आहे.

# विदेशात लपलेल्या २७४ फरार गुन्हेगारांना भारतात आणले

अमित शहांचा दावा

■ नवी दिल्ली

**विदेशात** पळून जाऊन लपलेल्या फरार गुन्हेगारांविरोधात केंद्र सरकारने कठोर कारवाई केल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. २०१९ पासून आतापर्यंत २७४ फरार गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात यश आले, अशी माहिती त्यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिली.

अमित शहा यांनी एक्सवर लिहिले की, मजबूत आणि सुरक्षित भारताच्या उद्देशाने मोदी सरकारने विदेशात लपून बसलेल्या फरार गुन्हेगारांविरोधात कारवाईचा फास आवळला आहे. गुन्हेगारांनी कोणत्याही देशात आश्रय घेतला असला, तरी राष्ट्रीय सुरक्षेच्या नव्या धोरणामुळे २०१९ पासून आतापर्यंत २७४ फरार गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात यश आले आहे. तीन नवीन कायद्यांमुळे फरार आरोपींच्या अनुपस्थितीतही खटला चालवण्याची तरतूद करण्यात आली आहे. पीएमएलएअंतर्गत १७,८७४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून, १८,७६२ कोटी रुपयांची मालमत्ता परत करण्यात आली आहे. 'भारतपोल'सारख्या यंत्रणांमुळे जगभरातील तपास यंत्रणांमध्ये समन्वय वाढला आहे. याउलट, यूपीए सरकारच्या काळात दरवर्षी सरासरी केवळ चार फरार गुन्हेगारांना भारतात परत आणले जात होते.

# धाराशिवमध्ये सावंत-मोटे समर्थकांत हाणामारी! ४५ जणांवर गुन्हा

■ धाराशिव

**धाराशिव** जिल्ह्यातील तेरखेडा येथे शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत आणि राष्ट्रवादीचे नेते राहुल मोटे यांच्या समर्थकांमध्ये आज तुफान राडा झाला. दोन्ही गट आमनेसामने आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात ४५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या राड्यादरम्यान दोन्ही बाजूंनी जोरदार दगडफेक करण्यात आली. इनोव्हा, फॉर्च्युनर आणि थारसह सुमारे १० ते १२ महागड्या गाड्यांची तोडफोड करण्यात आल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीपासून सावंत आणि मोटे गटांमध्ये राजकीय वैर असल्याचे बोलले जात असून, यापूर्वीही असे वाद झाले आहेत. या घटनेनंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीतील विजयानंतर सावंत गटाचा उन्माद वाढल्याने हा हल्ला झाल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. तर पराभव पचवता न आल्याने विरोधकांकडूनच वाद उकरून काढला जात असल्याचे सावंत गटाने म्हटले आहे.

तसेच राष्ट्रवादीने स्वतःच्याच गाड्या फोडून खोटे आरोप केल्याचा दावादेखील करण्यात आला आहे. या प्रकरणात कोणत्याही बाजूने अधिकृत तक्रार दाखल न झाल्याने पोलिसांनी स्वतःहून कारवाई करत ४५ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# शरद पवार गटाने सर्व प्रवक्ते हटवले

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने प्रवक्त्यांच्या नियुक्त्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी यापूर्वी प्रवक्तेपदासाठी केलेल्या सर्व नियुक्त्या तत्काळ प्रभावाने रद्द केल्या .

पक्षाने जारी केलेल्या पत्रकानुसार, राष्टवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने, ४ ऑगस्ट २०२६ पासून यापूर्वी पक्षाच्या प्रवक्तापदासाठी केलेल्या सर्व नियुक्त्या पुढील आदेश होईपर्यंत तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात येत आहेत. तसेच, या कालावधीत माजी आमदार विद्या चव्हाण आणि महेश तपासे हे पक्षाचे अधिकृत प्रवक्ते म्हणून प्रसारमाध्यमांसमोर पक्षाची अधिकृत भूमिका मांडतील.

# शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेला मुदतवाढ



■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ दिली. आता महिला शेतकरी व भूमिहीन शेतमजुरांचाही या योजनेत समावेश करण्यात आला. त्यामुळे अपघातामुळे मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास या घटकांनाही योजनेचा लाभ मिळणार आहे.

२०१९ पासून शेतकरी अपघात सुरक्षा योजनेतून अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाते. २०२३ मध्ये या योजनेला गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्यात आले. आता योजनेला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. आता महिला शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या या घटकांनाही अपघाताच्या प्रसंगी आर्थिक मदत मिळणार आहे.

# महापालिका बस-टँकर धडक १५ प्रवासी किरकोळ जखमी

**वसई :** वसई पूर्वेतील एव्हरशाईन परिसरात मंगळवारी सकाळी वसई-विरार महापालिकेच्या बसची रस्त्याकडेला उभ्या पाण्याच्या टँकरला जोरदार धडक बसून अपघात झाला. या अपघातात बसमधील सुमारे १५ प्रवासी किरकोळ जखमी झाले. वसई स्टेशन ते वसई फाटा मार्गावरील बस सकाळी नऊच्या सुमारास एव्हरशाईन येथे पोहोचली असता चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस थेट टँकरवर आदळली. धडकेमुळे प्रवाशांना मोठा हादरा बसला असून, काहींच्या डोके, चेहरा आणि नाकाला किरकोळ दुखापत झाली.

# कारगिलमध्ये ढगफुटी तर केरळमध्ये पावसाचे २१ बळी

■ नवी दिल्ली

**देशाच्या** अनेक भागांत मान्सूनने कहर केला असून, जम्मू-काश्मीरमधील कारगिलमध्ये मुसळधार पाऊस आणि ढगफुटीमुळे अचानक पूर आला. तर केरळमध्ये पावसाशी संबंधित घटनांमधील मृतांचा आकडा २१ वर पोहोचला असून सहा जण बेपत्ता आहेत. दरम्यान, हिमाचल प्रदेशात ७ ऑगस्टपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

कारगिलमधील हरदास आणि तुमैल गावात ढगफुटीमुळे अचानक पूर आला. अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून रस्ते आणि सार्वजनिक सुविधांचे नुकसान झाले. लष्कराने बचावकार्य करून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले. मिनामार्गजवळही पूर आणि भूस्खलनामुळे सुमारे २० बकरवाल नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. दरम्यान, ढिगारयामुळे द्रास-श्रीनगर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. तर केरळमध्ये मुसळधार पावसामुळे पूर आणि भूस्खलनाची स्थिती निर्माण झाली आहे. पठाणमथिट्टा जिल्ह्यातील रन्नी आणि अरनमुला भागात नद्यांची पाणीपातळी वाढली असून, ७४ मदत छावण्यांमध्ये तीन हजारांहून अधिक नागरिकांनी आश्रय घेतला आहे. हवामान विभागाने मध्य आणि उत्तर केरळमध्ये पुन्हा मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. प्रशासनाने नागरिकांना पूरग्रस्त आणि डोंगराळ भागात अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

# पालघर विमानतळ व्यवहार्यता अभ्यास निविदा प्रक्रिया सुरू

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर परिसरात प्रस्तावित कोरे ऑफशोअर विमानतळाच्या उभारणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पूर्व व्यवहार्यता अभ्यास, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली.समुद्रात भराव टाकून तयार करण्यात येणाऱ्या कृत्रिम बेटावर हा ग्रीनफिल्ड ऑफशोअर विमानतळ उभारण्याची योजना असून, त्याची अंमलबजावणी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर केली जाणार आहे.

# राम मंदिर देणगी चोरी प्रकरणी सीबीआय-ईडी काय करते आहे?

खरगे यांचा सवाल

■ नवी दिल्ली

**संसदेच्या** पावसाळी अधिवेशनाच्या १२ व्या दिवशी राम मंदिरातील देणगी चोरीच्या प्रकरणावरून लोकसभा आणि राज्यसभेत विरोधकांनी जोरदार गदारोळ केला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात शाब्दिक चकमक झाली. राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना केंद्र सरकारने केली असून, ट्रस्टला ७० एकरांहून अधिक जमीन देण्यात आली असल्याचे खरगे यांनी सांगितले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी राम मंदिराशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या कार्यक्रमात सहभागी झाले असल्याचे नमूद करत, या प्रकरणात ईडी, सीबीआय आणि इतर केंद्रीय तपास यंत्रणा काय करत आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सरकारने याबाबत संसदेत उत्तर द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.



यावर उत्तर देताना किरेन रिजिजू यांनी काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर टीका केली. राम मंदिराच्या उभारणीला विरोध करणारेच आज देणगी चोरीच्या मुद्यावर मगरीचे अश्रू ढाळत देशाची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

नवाकाळ

• मुंबई । बुधवार ५ ऑगस्ट, २०२६ • पान -८

## बाबरी पाडल्याप्रकरणी चौकशी करणारे न्या.लिबरहान यांचे निधन




**नवी दिल्ली-** अयोध्येतील बाबरी मशीद कारसेवकांनी पाडल्याप्रकरणी न्यायालयीन चौकशी करणाऱ्या लिबरहान आयोगाचे अध्यक्ष न्या. मनमोहन सिंह लिबरहान यांचे नुकतेच चंदीगडमध्ये वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. न्या. लिबरहान हे मद्रास आणि आंध्र प्रदेश उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश राहिले होते. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी पाडण्यात आल्यानंतर सरकारने न्या. लिबरहान यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन काँग्रेस सरकारने एक सदस्यीय चौकशी आयोग नेमला होता. या आयोगाने तब्बल १७ वर्षे चौकशी करून २००९ मध्ये आपला अहवाल दिला होता.

## अभिनेत्री त्रिशावर आक्षेपार्ह टिप्पणी उदयनिधी यांना अटक व सुटका

■ चेन्नई

**अभिनेत्री** त्रिशा कृष्णनवर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या आरोपावरून द्रमुक नेते व तामिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांना पोलिसांनी अटक केली आहे. तमिळगा वेत्री कळगम (टीव्हीके)च्या महिला आघाडीने दाखल केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली. मात्र मद्रास उच्च न्यायालयाने चौकशीनंतर त्यांच्या सुटकेचे आदेश दिले. त्यानंतर रात्री त्यांची सुटका करण्यात आली. सुटकेनंतर समर्थकांनी शक्तिप्रदर्शन केले.

तंजावूर येथे कावेरी नदीच्या पाण्याच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान उदयनिधी स्टॅलिन भाषण करत होते. यावेळी उपस्थितांमधून अभिनेत्री त्रिशाचे नाव घेऊन घोषणा देण्यात आल्या. त्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी केलेले वक्तव्य आक्षेपार्ह, अश्लील व अपमानकारक असल्याचा आरोप टीव्हीकेकडून करण्यात आला आहे. या प्रकरणी टीव्हीकेच्या महिला आघाडीच्या संघटक एस. भैरवी यांनी तंजावूर पूर्व



पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तसेच पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते पाझा सेल्वाकुमार यांनी राष्ट्रीय महिला आयोगाकडेही तक्रार केली आहे. या तक्रारीत सार्वजनिक व्यासपीठावरून महिलांचा अवमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर चेन्नईतील उदयनिधी स्टॅलिन यांच्या निवासस्थानी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला.

## नीट परीक्षा उत्तरपत्रिकांत गोंधळ! विद्यार्थी कोर्टात

■ नवी दिल्ली

**नीट** परीक्षा दिलेल्या सहा विद्यार्थ्यांनी त्यांच्या ओएमआर (ऑप्टिकल मार्क रिकग्निशन) उत्तरपत्रिकांमध्ये तफावत असल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी चिन्हांकित केलेली उत्तरे आणि एनटीएने अपलोड केलेल्या ओएमआर शीटमधील उत्तरे यात फरक आहे.

विद्यार्थ्यांच्या वकिलांनी तातडीने सुनावणीची मागणी केली असून, नीट कौन्सिलिंग सुरू असल्यामुळे प्रकरणात तातडी असल्याचे सांगितले. मुख्य न्या. सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने ही याचिका सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यास सहमती दर्शवली. वकिलांनी सांगितले की, संबंधित विद्यार्थ्यांना ६०० ते ६५० पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. मात्र या तफावतीमुळे त्यांच्या प्रवेशावर परिणाम होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी एनटीएकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही.

## ३० वर्षांच्या तरुणाची एवढी भीती का? अभिजित दीपकेंचा भाजपाला टोला

■ छत्रपती संभाजीनगर

**शिवसेना** शिंदे गटाचे आमदार भेटायला येत असल्याने भाजपा-शिंदेसेनेत वाद निर्माण झाल्याच्या चर्चांवरून 'कॉकरोच जनता पार्टी'चे अभिजित दीपके याने आज भाजपाला टोला लगावला. मी फक्त ३० वर्षांचा तरुण आहे, भाजपाला माझी एवढी भीती वाटते का? असा सवाल त्याने केला.

अभिजित दीपके याने सांगितले की, शिंदेसेनेचे नेते केवळ वैयक्तिक भेटीसाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी आले होते. युवकांचा मुद्दा आणि देशातील शिक्षणाचा प्रश्न आंदोलनातून



मांडल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. आंदोलनाला यश मिळाल्याबद्दल त्यांनी शुभेच्छा दिल्या. यापलीकडे कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. भाजपाला एवढी घाबरण्याची गरज नाही. ईडी, सीबीआय सर्व तुमच्याकडे आहे, आमच्याकडे काय आहे? मी ३० वर्षांचा तरुण आहे. माझी एवढी भीती वाटते? याशिवाय त्यांनी बिहार

**शिंदे सेना नेत्यांशी केवळ सदिच्छा भेटी**

बांकीपूर पोटनिवडणुकीबाबत म्हटले की, प्रशांत किशोर हे राजकारणात नवीन चेहरा म्हणून पुढे आले आणि जिंकून आले. त्यांना खूप खूप शुभेच्छा. जास्तीत जास्त नवीन लोकांनी पुढे आले पाहिजे.

## बेस्ट उपक्रमाची कमान आता कंत्राटी बस चालकाच्या हातात

■ मुंबई

**मुंबईकरांची** जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या बस सेवेमध्ये १० वर्षांत मोठा बदल झाला आहे. बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात सध्या कंत्राटी बसेसचे प्रमाण वाढले असून, केवळ २४९ बसेस स्वतःच्या मालकीच्या उरल्या आहेत. एकूण ताफा सुमारे २,७०० ते २,८०० बसेसचा असून, उर्वरित सर्व बसेस कंत्राटी तत्त्वावर चालवल्या जात आहेत.

**बेस्टकडे मालकीच्या केवळ २५० बसेस**

सध्या बेस्ट उपक्रमात बहुतांश बसेस आणि त्यांचे चालक खासगी कंत्राटदारांमार्फत पुरवले जातात. जुन्या बसेस कालबाह्य झाल्यामुळे व नवीन खरेदीचा वेग कमी असल्याने स्वतःच्या बस कमी झाल्या आहेत. मात्र कंत्राटी चालकांचे अपुरे प्रशिक्षण व गाड्यांच्या देखभाल-दुरुस्तीतील त्रुटींमुळे सेवा आणि सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे. २०१६ मध्ये बेस्टच्या मालकीच्या तब्बल ३,९०२ बस रस्त्यावर धावत होत्या. मात्र जून २०२६ पर्यंत बेस्टच्या मालकीच्या बसची संख्या अवघी २४९ राहिली आहे. त्याचवेळी भाडेतत्त्व पद्धतीने तब्बल २,५३२ बस सेवेत घेतल्या आहेत.

## भाजपाने मुंबईतील मोक्याची सोळा एकर जमीन लाटली

**आदित्य ठाकरेंचा आरोप**

■ मुंबई

**ठाकरे** गटाचे वरळीचे आमदार आदित्य ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करून सत्ताधारी भाजपावर मुंबईतील १६ एकर मोकळी जमीन लाटल्याचा गंभीर आरोप केला. भाजपाला मुंबईतील मोकळ्या जागा बळकावून त्या स्वतःच्या घशात घालण्याचे एक अजबच खूळ लागले आहे. आम्ही याला ताकदीने विरोध करू, असे आदित्य ठाकरे म्हणाले. तसेच भाजपा सरकारच्या या जमीन बळकावू वृत्तीच्या विरोधात सर्व मुंबईकरांना रस्त्यावर उतरण्याचे आवाहन आदित्य ठाकरे यांनी आपल्या पोस्टमधून सांगितले.



आदित्य ठाकरे पुढे म्हटले की, मुंबईतील निवडणुका लढवण्यामागचा भाजपाचा उद्देश शहरातील मोकळ्या जागांवर ताबा मिळवणे आणि त्या आपल्या लोकांना देणे हाच आहे. मुंबईतील एकमेव कृत्रिम गवताचे फुटबॉल मैदान बळकावून त्याठिकाणी कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचा आणि त्याला त्यांच्या एका नेत्याचे नाव देण्याचा भाजपाचा डाव आहे. याव्यतिरिक्त त्यांनी आपल्याच पक्षाच्या आणखी दुसऱ्या नेत्याला अतिरिक्त १६ एकर जमीन भेट म्हणून दिली. या १६ एकर जमिनीमध्ये एक क्रिकेट मैदान समाविष्ट आहे, जे मविआच्या काळात सर्वसामान्य मुंबईकरांना खेळण्यासाठी विकसित करण्यात आले होते.

## ६ ऑगस्टपर्यंत राज्यातील तुरळक भागातच पावसाच्या हलक्या सरी

■ परभणी

**राज्यात** पुढील चार दिवसांत मोठा बदल होणार आहे. ६ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्रातील बहुतांश भागांत पावसाचा जोर ओसरणार असून, केवळ तुरळक भागातच हलका पाऊस पडेल. या काळात मोठी अतिवृष्टी किंवा सतत मुसळधार पाऊस असणार नाही, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

**पंजाबराव डख यांचा ताजा हवामान अंदाज**

पंजाबराव डख यांनी एका व्हिडिओद्वारे आपला ताजा हवामान अंदाज व्यक्त करताना म्हटले आहे की, ६ ऑगस्टपर्यंत दुपारपर्यंत कडक ऊन पडेल आणि दुपारनंतर किंवा संध्याकाळी स्थानिक वातावरणामुळे विजांच्या कडकडाटासह १० मिनिटे ते अर्धा तास अगदी लहान विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. मोठा पाऊस नसल्यामुळे आणि चांगले सूर्यदर्शन राहणार असल्याने शेतकऱ्यांनी १५ ऑगस्टपर्यंत आपली शेतीची कामे पूर्ण करून घ्यावीत. धाराशिव, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, नांदेड, अमरावती, अकोला, बुलडाणा, चिखली, सिंदखेडराडा, मालेगाव, नांदुरा, अकोट या भागांमध्ये दुपारपर्यंत ऊन राहील.

## 'लिव्ह-इन'मधील महिलांनाही हक्क क्रूरता, छळाचा आरोप करू शकतात

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने लिव्ह - इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलांना पत्नीसारखेच कायदेशीर संरक्षण देणारा ऐतिहासिक निकाल दिला आहे.

आता जोडीदाराकडून किंवा त्याच्या कुटुंबियांकडून होणाऱ्या छळाच्या प्रकरणांमध्ये लिव्ह-इन पार्टनरलाही पत्नीप्रमाणेच कलम ४९८- अ अंतर्गत संरक्षण मिळणार आहे. दोषी आढळल्यास आरोपीला ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, क्रूरतेपासून मिळणाऱ्या संरक्षणाची

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कायदेशीर तरतूद ही केवळ पारंपरिक विवाहसंस्थेपर्यंत मर्यादित ठेवली जाऊ शकत नाही. समाजात होत असलेल्या बदलांनुसार कायद्याचे स्वरूप आणि त्याचा विस्तार होणे काळाची गरज आहे. लिव्ह-इन मधील जोडीदार पुरुष असो वा स्त्री अशा नात्यांचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. त्यामुळे विवाहित महिलांप्रमाणेच लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्यांनाही छळाविरुद्ध कलम ४९८-अ अंतर्गत न्यायाचा समान अधिकार मिळणे आवश्यक आहे. कलम ४९८-अ अंतर्गत दोषी आढळणाऱ्या पुरुषाला किंवा त्याच्या नातेवाईकांना तीन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

## राज्यातील टीईटी उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांचा पदोन्नती मार्ग मोकळा

■ मुंबई

**राज्यातील** प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेला अखेर गती मिळणार आहे. शालेय शिक्षण विभागाने नवीन सुधारित नियमावली आणि वेळापत्रक जाहीर करीत टीईटी आणि सीटीईटी पात्र शिक्षकांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा केला आहे. यापूर्वी केवळ २०२१ पूर्वी टीईटी उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांनाच पदोन्नतीचा लाभ मिळत होता. मात्र, नव्या निर्णयामुळे राज्यातील सर्व टीईटी-सीटीईटी पात्र शिक्षकांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होणार आहे.

शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेत सातत्याने होणारा विलंब, रिक्त पदे आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमधील हजारो शिक्षकांना दिलासा मिळणार आहे. शालेय शिक्षण विभागाने पदोन्नती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सुधारित नियमावली लागू केली आहे.

## आमीर खानला धमकी देणारा आवाज अर्जू बिश्नोईचाच! तपासातून खुलासा

■ मुंबई

**अभिनेता** आमीर खानला देण्यात आलेल्या धमकी प्रकरणात पोलिसांच्या तपासातून महत्त्वाची माहिती मिळाली आहे. धमकीच्या ऑडिओमधील आवाज हा लॉरेन्स बिश्नोई गँगचा सदस्य अर्जू बिश्नोई याच्या जुन्या रेकॉर्डिंगमधील आवाजाशी जुळल्याची माहिती आहे. पंजाब पोलिसांनी ही माहिती मुंबई पोलिसांना दिली आहे त्यामुळे या प्रकरणातील बिश्नोई गँगचे कनेक्शन अधिक असल्याचा पुरावा बळकट झाल्याचे मानले जात आहे.



पंजाब पोलिसांकडे यापूर्वीच्या एका प्रकरणाच्या तपासातील अर्जू बिश्नोईच्या आवाजाचे रेकॉर्डिंग उपलब्ध होते. आमीर खानला धमकी देणाऱ्या व्हायरल ऑडिओमधील आवाजाची या जुन्या रेकॉर्डिंगशी पडताळणी केली असता दोन्ही आवाज एकाच व्यक्तीचे असल्याचे पोलिसांना समजले. आता ऑडिओ सोशल मीडियावर कोणी अपलोड केला, याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, संदेश पाठवण्यासाठी स्वीडनमधील व्हीपीएन ब्राउजरचा वापर करून ओळख लपवण्याचा प्रयत्न झाल्याचे तपासात उघड झाले आहे. क्राईम ब्रँच आणि सायबर सेल आता डिजिटल पुराव्यांचा तपास करत आहे.

## बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ८४७ कांदळवने तोडण्यास उच्च न्यायालयाची परवानगी

■ मुंबई

**मुंबई-अहमदाबाद** बुलेट ट्रेन प्रकल्पाशी संबंधित पायाभूत सुविधांसाठी ८४७ कांदळवने तोडण्यास उच्च न्यायालयाने मंगळवारी मंजुरी दिली. याचवेळी वृक्षलागवडीवरून प्रशासनाला खडेबोल सुनावले. भरपाई म्हणून केली जाणारी वृक्षलागवड केवळ आकड्यांचा खेळ असू शकत नाही. शेकडो किलोमीटर दूर झाडे लावल्याने स्थानिक पर्यावरणाची झालेली हानी भरून निघत नाही, असे न्यायालय म्हणाले.

**वृक्षलागवडीवरून खडे बोल**

'महाट्रान्सको'च्या याचिकेवर सुनावणी करताना प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने कांदळवन तोडण्यास परवानगी देत बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मार्ग मोकळा केला. यावेळी खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निकालांचा हवाला दिला. महाट्रान्सको कंपनीने बुलेट ट्रेनसाठी अत्यंत आवश्यक असलेली १३२ केव्हीची ट्रान्समिशन लाईन आणि उपकेंद्र उभारण्यासाठी परवानगी मागितली होती. हा प्रकल्प 'राष्ट्रीय महत्त्वाचा' असल्याने न्यायालयाने यात हस्तक्षेप करणे टाळले.

## भोंदू खरात संबंधित बनावट खाती समता पतसंस्थेच्या बनकरांना अटक

■ राहाता

**भोंदू** अशोक खरातशी संबंधित समता नागरी सहकारी पतसंस्थेतील १०० बनावट खाती प्रकरणात एसआयटीने कारवाई करत राहाता शाखेचे व्यवस्थापक मिलिंद बनकर यांना अटक केली. या प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक उर्फ 'भोंदू' खरात याच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनंतर बनकरवर कारवाई केल्याची माहिती आहे. ५७ व्यक्तींच्या नावावर १०० बनावट खाती उघडल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, या खात्यांमधून झालेल्या आर्थिक व्यवहारांच्या साखळीची तपासणी केली जात आहे. या खात्यांपैकी अनेक खात्यांमध्ये अशोक खरात नॉमिनी असल्याची माहिती आहे. या खात्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.

## आसारामला रुग्णालयात ठेवण्याची गरज नाही ! पण देखरेख आवश्यक

■ नवी दिल्ली

**स्वयंघोषित** आध्यात्मिक गुरू आणि लैंगिक अत्याचाराचा आरोपी आसाराम बापू याला रुग्णालयात दाखल करण्याची गरज नाही. मात्र त्याला चोवीस तास डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवावे लागेल, असा अहवाल अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) डॉक्टरांनी आज सर्वोच्च न्यायालयात सादर केला. अहवालातील निष्कर्ष परस्परविरोधी आहेत, असे म्हणत न्यायालयाने असमाधान व्यक्त केले.

**'एम्स'चा अहवाल! कोर्ट नाराज**

आसाराम बापूने वैद्यकीय कारणास्तव जामिनासाठी अर्ज केला आहे. या अर्जावर न्या. एम. एम. सुंद्रेश आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली.



याआधीच्या सुनावणीत त्याच्या अर्जावर विचार करण्यापूर्वी न्यायालयाने एम्सच्या संचालकांना वैद्यकीय पथक स्थापन करून आसारामची वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार एम्सने आज हा अहवाल सादर केला.

## केंद्र सरकारचे मेटा अधिकाऱ्यांना दिल्लीत हजर राहण्याचे आदेश

■ नवी दिल्ली

**टेक** क्षेत्रातील आघाडीची कंपनी मेटाच्या अधिकाऱ्यांना केंद्र सरकारने ५ आणि ६ ऑगस्ट रोजी दिल्लीत हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या दोन दिवसांत मेटाच्या अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक होणार आहे. यामध्ये बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्री, व्हेरिफाईड खात्यांवरील कारवाई आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार होणाऱ्या कंटेंटसह अनेक मुद्द्यांवर या चर्चा होणार असल्याची माहिती आहे. ईलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी सांगितले की, मेटाच्या प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह किंवा धोकादायक सामग्री कशी रोखली जाते, याबाबत सरकार कंपनीकडून स्पष्टीकरण मागणार आहे. विशेषतः इन्स्टाग्रामवरील सशुल्क जाहिरातींमध्ये बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्री आढळल्याने केंद्र सरकारने यापूर्वीच मेटाला नोटीस बजावली आहे.

## झारखंड विद्यार्थी आंदोलन आणखी पेटले महातोंसह पाच विद्यार्थ्यांचे उपोषण सुरू

■ रांची

**झारखंडमध्ये** जेपीएससी व जेएसएससीच्या परीक्षांमधील गैरप्रकारांविरोधात जयपाल सिंह मुंडा स्टेडियममध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन आणखी तीव्र झाले आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे देवेंद्र महातो यांच्या उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी आणखी पाच विद्यार्थ्यांनी आजपासून उपोषण सुरू केले आहे. भरती प्रक्रिया पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त करावी, तसेच परीक्षांमधील अनियमिततेची चौकशी करून दोषींवर कारवाई



करावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. दरम्यान, दिशोम गुरू शिबू सोरेन यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली मार्च काढत आंदोलन त्यांच्या नावाने समर्पित केले.

देवेंद्र महतो यांनी एक्सवर लिहिले की, उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे तर धरणे आंदोलनाचा ११वा दिवस आहे. दिशोम गुरु शिबू सोरेन यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करत हे आंदोलन त्यांच्या नावाला समर्पित करतो.

## विलास घुले हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग

■ बीड

**जिल्ह्यातील** केज तालुक्यातील टाकळी येथील बहुचर्चित विलास घुले हत्या प्रकरणाला मोठे वळण मिळाले असून, या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात आला आहे.

विलास घुले हत्या प्रकरणात आतापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली असली, तरीही मुख्य आरोपींवर कारवाई होत नसल्याचा आरोप घुले कुटुंबियांनी केला होता. कुटुंबियांनी २९ जुलै रोजी राज्याचे पोलीस महासंचालक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. या निवेदनात प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब आणि पुरावे उपलब्ध असूनही राजकीय दबावामुळे काही आरोपींना वाचवले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनावणे यांचा मुलगा व प्रमुख संशयित सौरव सोनवणे याला अद्याप एफआयआरमध्ये आरोपी करण्यात आलेले नाही.

## मुंबई पोलीस दलात ६ कोटींचा वेतन घोटाळा! २ अधिकाऱ्यांचे निलंबन

■ मुंबई

**मुंबई** पोलीस दलात ६.४१ कोटींचा वेतन घोटाळा उघडकीस आला असून, या प्रकरणात दोन पोलीस अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलीस प्रशासनात खळबळ उडाली आहे.

पोलिसांचे वेतन काढण्याची जबाबदारी असलेल्या मंत्रालयातील आजी-माजी अधिकाऱ्यांनीच शासनाच्या साडेसहा कोटी रुपयांवर डल्ला मारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.



या प्रकरणी समतानगर पोलीस ठाण्यात एका निरीक्षकाच्या फिर्यादीवरून पाच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घोटाळ्यात पोलिसांच्या अधिकृत यादीत आठ ते दहा बनावट नावे घुसवण्यात आली होती. या बोगस व्यक्तींच्या नावावरून नियमित मासिक वेतन काढले जात असल्याचा आरोप आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी बनावट पोलीस सर्व्हिस आयडी आणि डीसीपीएस आयडी तयार करून त्याआधारे पगार मंजूर करून घेतला, अशी माहिती तपासात उघड झाली आहे.